सोलापूर
Solapur Tarun Bharat
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०३ ऑगस्ट २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ११० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात

### आता लॉकरमध्ये पडलेल्या सोन्यातून मिळणार नफा



**मुंबई :** भारतीय कुटुंबांमध्ये सोन्याला गुंतवणुकीचा सर्वात सुरक्षित पर्याय मानले जाते. अनेकजण भविष्यातील गरज लक्षात घेऊन सोने खरेदी करतात, तर काहीजण दागिन्यांच्या स्वरूपात ते जपून ठेवतात. मात्र, हेच सोने अनेकदा घरात किंवा बँकेच्या लॉकरमध्ये वर्षानुवर्षे निष्क्रिय पडून राहते. आता अशा सोन्यातूनही दरवर्षी अतिरिक्त कमाई करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. डिजिटल गोल्ड प्लॅटफॉर्म SafeGold आणि प्रसिद्ध ज्वेलरी ब्रँड BlueStone यांनी संयुक्तपणे एक अभिनव योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत ग्राहकांचे फिजिकल सोने डिजिटल गोल्डमध्ये रूपांतरित केले जाईल आणि त्यावर वर्षाला ४ टक्क्यांपर्यंत परतावा मिळू शकणार आहे.

### इंडोनेशिया समुद्रात प्रवासी बोटला आग 5 जणांचा मृत्यू, 41 बेपत्ता

**जकार्ता :** इंडोनेशियातील मदुरा बेटाजवळ रविवारी (2 ऑगस्ट) एक मोठी सागरी दुर्घटना घडली. प्रवाशांनी भरलेल्या एका फेरीला अचानक भीषण आग लागल्याने किमान पाच जणांचा मृत्यू झाला असून 41 जण बेपत्ता आहेत. या घटनेनंतर समुद्रात मोठ्या प्रमाणावर शोध आणि बचाव मोहीम सुरू करण्यात आली आहे. इंडोनेशियाच्या राष्ट्रीय शोध आणि बचाव संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, फेरीमध्ये प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसह एकूण 271 जण प्रवास करत होते. रविवारी दुपारपर्यंत 225 जणांची सुखरूप सुटका करण्यात आली असून बेपत्ता प्रवाशांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.


### भाडेकरू पडताळणीबाबत पुणे पोलिसांची कारवाई; 41 जणांवर गुन्हे

**पुणे :** भाडेकरार आणि पोलिस पडताळणी न करता घरे भाड्याने देणाऱ्या घरमालकांवर तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या भाडेकरूंवर पुणे शहर पोलिसांनी विशेष कारवाई सुरू केली आहे. ४१ घरमालक आणि भाडेकरूंवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. शहरात शिक्षण, नोकरी आणि व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक भाडेतत्त्वावर किंवा पेइंग गेस्ट म्हणून राहत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही मोहीम राबविण्यात येत आहे. काही गुन्ह्यांमध्ये भाडेकरूंचा सहभाग आढळून आल्याने त्यांची माहिती पोलिसांकडे नोंदविणे अनिवार्य करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घरमालकांनी सिटीझन पोर्टलवर भाडेकरू किंवा पेइंग गेस्टची माहिती ऑनलाइन नोंदविणे आवश्यक आहे.

### मनपातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची छाननी, कामचुकारांवर कारवाई

**छत्रपती संभाजीनगर :** मनपातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची छाननी सुरू करण्यात आली असून, कामचुकारांवर कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिकेतील २,११२ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची लवकरच सखोल छाननी केली जाणार आहे. सहा एजन्सींमार्फत नियुक्त कर्मचाऱ्यांचा मेळावा घेऊन त्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल. कामचुकार व गरज नसलेल्या कर्मचाऱ्यांची कपात करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. विभागप्रमुखांकडून प्रत्येक कर्मचाऱ्याचा अहवाल मागविण्यात येणार असून अतिरिक्त कर्मचारी कमी केले जातील. तसेच आर्थिक जबाबदाऱ्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांकडेच असाव्यात, असे निर्देश आयुक्त अमोल येडगे यांनी दिले आहेत. या प्रकरणामुळे महानगरपालिकेत मोठी खळबळ उडाली आहे कर्मचारी आता काय भूमिका घेतात आणि प्रशासन काय करते यावर सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.

# पंतप्रधानांच्या हस्ते नशामुक्त युवा-विकसित भारत संकल्प अभियानाचा शुभारंभ



**नवी दिल्ली, २ ऑगस्ट :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तरुणांना अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. अमली पदार्थांमुळे तात्पुरता आनंद मिळतो, पण ते तुमचे करिअर आणि कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त करतात, असे ते म्हणाले. त्यामुळे, आपले तरुण व्यसनाधीनतेचे धोके समजून घेतील आणि सतर्क राहून त्यापासून दूर राहतील, हे सुनिश्चित करण्याचा आपण संकल्प केला पाहिजे.

पंतप्रधान मोदी यांनी नशामुक्त युवा -विकसित भारत संकल्प अभियानाचा शुभारंभ केला. यावेळी, देशभरातील २८,००० हून अधिक ठिकाणी एक कोटींहून अधिक तरुण व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सहभागी झाले.

पंतप्रधान म्हणाले की, अमली पदार्थांचे व्यसन कुटुंब, समाज आणि राष्ट्राची शक्ती कमकुवत करते. शत्रू देशसुद्धा देशातील तरुणांना अमली पदार्थांच्या व्यसनात ओढण्याचा कट रचतात. परिणामी, अमली पदार्थांच्या पुरवठ्यातून नफा कमावून देशाचा नाश करणे हा देखील एका दहशतवादी कटाचा भाग आहे. त्यामुळे, आपण प्रत्येक तरुणाला अमली पदार्थांच्या व्यसनाच्या विळख्यात सापडण्यापासून वाचवले पाहिजे.

सामूहिक शक्तीवर जोर देत पंतप्रधान म्हणाले की, वैयक्तिक प्रयत्नांमुळे निराशा आणि थकवा येऊ शकतो, पण जेव्हा एखादी मोहीम सामूहिक स्वरूप धारण करते आणि लाखो लोक एकत्र पुढे जातात, तेव्हा सामूहिक शक्ती तिला नवी ऊर्जा देते.

पंतप्रधानांनी माहिती दिली की, देशभरातील लाखो तरुणांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली आहे. त्यांनी सांगितले की, ही शपथ पुढील १०० आठवडे सुरू राहील. या काळात, दर रविवारी कला, संस्कृती, क्रीडा, ध्यान, अध्यात्म आणि सेवा यासंबंधी उपक्रम आयोजित केले जातील. या कार्यक्रमांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवला जाईल. ते म्हणाले की, येणारे १०० रविवार हे अमली पदार्थमुक्त भारताच्या दिशेने उचललेली १०० भक्कम पावले ठरतील.पंतप्रधानांनी व्यसनमुक्तीसाठी योग, ध्यान आणि पुनर्वसन यांच्या महत्त्वावर भर दिला. ते म्हणाले की, समाजाच्या पाठिंब्याने या पद्धती व्यक्तीच्या आंतरिक शक्तीला बळकट करतात. त्यांनी नमूद केले की, आज व्यसनमुक्तीसाठी पुनर्वसन केंद्रांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

## दिल्लीत 2.9 तीव्रतेचा सौम्य भूकंपाचा धक्का

**नवी दिल्ली, 02 ऑगस्ट :** देशाची राजधानी दिल्लीमध्ये रविवारी पहाटे सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले. पहाटे सुमारे ४ वाजून १४ मिनिटांनी झालेल्या या भूकंपाची रिश्टर स्केलवरील तीव्रता २.९ इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाची तीव्रता कमी असल्याने आणि तो पहाटेच्या वेळी झाल्यामुळे बहुतांश नागरिकांना त्याची जाणीव झाली नाही. मात्र काही नागरिकांनी हलके कंप जाणवल्याचे सांगितले. सुदैवाने या भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीच्या माहितीनुसार, रविवारी पहाटे ४ वाजून १४ मिनिटे १ सेकंदांनी हा भूकंप झाला. त्याचे केंद्र उत्तर दिल्लीमध्ये २८.७२१ अंश उत्तर अक्षांश आणि ७६.९५७ अंश पूर्व रेखांशावर होते.

# धर्मांतर-विरोधी कायदा राज्यात लागू

### राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर अधिकृत राजपत्र (गॅझेट) प्रकाशित

**मुंबई, २ ऑगस्ट :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाल्यानंतर राज्यात धर्मांतर-विरोधी कायदा - 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, 2026' आता राज्यात लागू झाला आहे. या संदर्भातील अधिकृत राजपत्र (गॅझेट) 30 जुलै रोजी प्रकाशित झाले. त्यानुसार राज्यात उपरोक्त कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

सदक्ष विधेयक विधिमंडळाने मार्चमधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केले होते. पुढे तो मंजुरीसाठी राज्यपाल व नंतर राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आला होता. हा कायदा बळजबरी, फसवणूक, आमिष, चुकीची माहिती किंवा लग्नाचे आश्वासन देऊन केल्या जाणाऱ्या धर्मांतरास प्रतिबंध करतो. या कायद्याचे उल्लंघन केल्यास सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद आहे, तर पुन्हा गुन्हा करणाऱ्यांसाठी ही शिक्षा 10 वर्षांपर्यंत वाढू शकते. धर्मांतरापूर्वी जिल्हा दंडाधिकाऱ्यांना 60 दिवस आधी सूचना देणे यात अनिवार्य करण्यात आले आहे; तसेच धर्मांतरित व्यक्तीचे पालक, भावंडे आणि इतर नातेवाईक यांना तक्रार करण्याचा अधिकारही यात देण्यात आला आहे. विधानसभेत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी), समाजवादी पक्ष आणि सीपीआय (एम) यांनी या विधेयकाला विरोध केला होता, मात्र शिवसेना (यूबीटी) ने त्याला पाठिंबा दिला होता.

## राज्यात लवकरच नवा लँड टायटलिंग कायदा - महसूलमंत्री बावनकुळे

**रत्नागिरी, 2 ऑगस्ट :** जमिनींच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या सोयीसाठी राज्य सरकार डिसेंबरच्या अधिवेशनात लँड टायटलिंग कायदा आणणार आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज रत्नागिरीत केली.

येथील गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिरात ते बोलत होते. या वेळी जवळपास २३०० परिवारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला. बावनकुळे म्हणाले, 'आधी मोजणी, त्यानंतर नोंदणी आणि त्यानंतर फेरफार' हे नव्या कायद्याचे तत्त्व असेल. कूळ, वहिवाटदार आणि देवस्थानांचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी देवस्थान जमीन इनाम कायदाही लवकरच आणला जाईल. यापूर्वी ब्रिटिशांच्या काळात जमिनीची मोजणी झाली होती. आता पुढच्या दोन वर्षांत राज्यातील सर्व जमिनींची सरकारी मोजणी करण्यात येणार आहे. रत्नागिरी शहराचाही 'सीटीएस'मध्ये (सिटी टायटल सर्व्हे) समावेश केला जाणार असून, शेतकऱ्यांच्या जमिनीच्या सीमा निश्चित केल्या जाणार आहेत. कोतवालांना तलाठी भरतीमध्ये २० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय लवकरच घेतला जाईल.

# नाथसागराचे सायरन वाजणार, कोणत्याही क्षणी होणार गोदावरी पात्रात विसर्ग

### सध्याच्या परिस्थितीत 32 हजार 881 क्युसेक पाण्याची आवक सुरू

**पैठण प्रतिनिधी :-** मराठवाड्याची जलसंपदा असलेले नाथसागर जलाशय तुडुंब भरले असून धरणाचा पाणीसाठा ८५ टक्के झाला आहे. पाणलोट क्षेत्रातील धरणातून जायकवाडीत येणाऱ्या पाण्याची आवक पाहता धरण प्रशासनाकडून कोणत्याही क्षणी गोदावरी पात्रात नाथसागरातून विसर्ग करण्यात येणार असल्याचा ईशारा नागरिकांना देण्यात आला आहे.





अगदी २७% पर्यंत पाणी साठ्याची पातळी खालावलेल्या नाथसागर जलाशयाचा पाणीसाठा नाशिक आणि अहिल्यानगर भागात सुरू असलेल्या चांगल्या पावसामुळे ८५ टक्के पर्यंत गेला असून आता धरण प्रशासनाकडून गोदावरी पात्रात पाण्याचा विसर्ग करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येणार आहे. वरील धरणातून नाथसागरात येणाऱ्या पाण्याची आवक वाढल्यास जायकवाडीच्या २७ पैकी ५ वक्र द्वारातून गोदावरी पात्रात विसर्ग करण्यात येणार आहे.तत्पूर्वी नागरिकांनी गोदावरी पात्रात काही तटस्थस्थान वाहने अथवा जनावरे असल्यास तात्काळ तेथून हलवावीत तसेच गोदावरी पात्रात वावर करू नये, पाण्यापासून सतर्क रहावे अशी सूचना जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता गणेश हासे तसेच नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ.पल्लवी अंभोरे यांच्या वतीने देण्यात आल्या आहे.

रविवारी दिनांक २ ऑगस्ट सायंकाळी ६ वाजता नाथसागर जलाशयाचा पाणी साठा ८४. ९० टक्के,पाण्याची आवक ३२ हजार ९३१ क्यूसेक तसेच धरणाच्या उजव्या आणि डाव्या कालव्यातुन १९०० क्यूसेक प्रमाणे पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. नाथसागर जलाशय १००% भरण्यासाठी आणखीन तीन फूट पाण्याची आवश्यकता आहे.मागील वर्षी १ ऑगस्ट रोजी जायकवाडी धरणातून गोदावरी पात्रात विसर्ग करण्यात आला होता.

#### नागरिकांना सतर्कतेचे आवाहन, प्रभावित होणारी गावे

नाथसागरातून विसर्ग होणार असल्याने खबरदारी म्हणून जुने कावसान, चनकवाडी, पाटेगाव, दादेगाव वडवाळी, नायगाव मायगाव आपेगाव नवगाव तुळजापूर टाकळी अंबड, हिरडपुरी आदी गावात दवंडी पीटून नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात येत आहे. शहरातील सखल भाग असलेल्या संतनगर,कहारवाडा तसेच गागाभट्ट चौक, नागघाट परिसर आदी ठिकाणी नगरपरिषदेच्या वतीने सुचना देण्यात येत आहे.

# 102 रुग्णवाहिकांसाठी 'कॅशलेस पेट्रोकार्ड' सुविधेचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा

**मुंबई :** राज्यातील आरोग्य सेवा अधिक तंत्रस्नेही, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई येथे १०२ रुग्णवाहिकांसाठी 'कॅशलेस पेट्रोकार्ड' या नाविन्यपूर्ण सुविधेचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमामुळे राज्यातील रुग्णवाहिका सेवांचे व्यवस्थापन अधिक सक्षम, गतिमान आणि परिणामकारक होणार आहे.





या उपक्रमांतर्गत राज्यातील ३,१९५ रुग्णवाहिकांना हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपीसीएल) कंपनीचे 'कॅशलेस पेट्रोकार्ड' उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे रुग्णवाहिकांसाठी इंधन खरेदीची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम होईल. आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढून निधीचा प्रभावी वापर सुनिश्चित होईल. तसेच इंधन खरेदीतील अनावश्यक विलंब कमी होऊन रुग्णवाहिका सेवा अधिक वेगवान आणि उत्तरदायी बनेल.

यावेळी १०२ रुग्णवाहिका सेवेबाबतही महत्त्वाचा निर्णय जाहीर करण्यात आला. यापूर्वी ही सेवा प्रामुख्याने माता व बालकांसाठी उपलब्ध होती. आता पुढे १०२ रुग्णवाहिका सेवा सर्व रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार असून, ही सेवा अधिक सक्षम व प्रभावी करत १०८ रुग्णवाहिका सेवेचा प्रभावी पर्याय म्हणून विकसित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

कार्यक्रमास आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त जगन्नाथ विरकर, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनिता गोलाईत, प्रकल्प संचालक (ईएमएस) रवींद्र सावंत, उपसंचालक जयंत मुळे उपस्थित होते.

## दक्षिणेत पावसाचा कहर; केरळात 8 तर कर्नाटकात कुटुंबातील तिघांचा मृत्यू

**तिरुवनंतपुरम, 02 ऑगस्ट :** मुसळधार पावसामुळे दक्षिण भारतीय राज्यांमध्ये हाहाकार माजला आहे. केरळममध्ये पावसामुळे झालेल्या घटनांमध्ये आठ जणांचा मृत्यू झाला असून, त्यामुळे हजारो लोकांना आपली घरे सोडून पलायन करण्यास भाग पडले आहे. दरम्यान, शेजारील कर्नाटकातील शिवमोग्गा येथे भूस्खलनात एकाच कुटुंबातील तीन सदस्यांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार केरळमध्ये मुसळधार पावसामुळे झालेल्या दुर्घटनांमध्ये आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाला असून, आठ जण बेपत्ता आहेत. राज्य सरकारने तातडीने बचावकार्य सुरु केले असून, २०९ मदत शिबिरे उभारून ५ हजार ७९२ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. केरळच्या मुख्यमंत्री कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, पावसामुळे झालेल्या दुर्घटनांमध्ये १३ जण जखमी झाले आहेत. राज्यातील २७ घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून, १९६ घरांचे नुकसान झाले आहे.

## राज्यात पुढील तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई, 02 ऑगस्ट :** राज्यात मान्सूनचा जोर पुन्हा एकदा वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने पुढील तीन दिवसांसाठी राज्यातील विविध भागांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ३ ऑगस्ट रोजी कोकण आणि गोवा भागात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात तुरळक ठिकाणी जोरदार ते अति मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज आहे. रायगड, रत्नागिरी, पुणे घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा घाट परिसर तसेच अकोला, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि वर्धा या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

## शासकीय कार्यक्रमात जि.प. व पं.स. सदस्यांना निमंत्रण नसल्याने सचिन गरड यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य शासनाच्या वतीने शनिवारी (दि. १ ऑगस्ट) सूर्या लॉन्स, बीड बायपास रोड येथे छत्रपती संभाजीनगर पूर्व, पश्चिम व मध्य तालुक्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला पालकमंत्री संजय सिरसाट, मंत्री अतुल सावे, आमदार सुहास सिरसाट, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत तसेच जिल्हाधिकारी विनय गौडा यांची प्रमुख उपस्थिती होती.



मात्र, या महत्त्वाच्या शासकीय कार्यक्रमासाठी संबंधित तीन तालुक्यांतील जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्यांना निमंत्रित करण्यात आले नसल्याचा आरोप करत जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती सचिन गरड पाटील यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्याकडे तक्रार केली.

यापूर्वीही अनेक शासकीय कार्यक्रमांमध्ये जिल्हा परिषद सदस्यांना सातत्याने डावलले जात असल्याचा मुद्दा सचिन गरड पाटील यांनी मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीतच जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडला. ग्रामीण भागातील नागरिकांच्या विविध समस्या सर्वप्रथम जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांकडे मांडल्या जातात. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींनाच शासकीय कार्यक्रमांपासून दूर ठेवले जात असल्याने नागरिकांच्या प्रश्नांचे प्रभावीपणे निराकरण कसे होणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.


ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींचा सहभाग अत्यावश्यक असल्याचे सांगत, भविष्यात अशा सर्व शासकीय कार्यक्रमांसाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना नियमितपणे निमंत्रित करण्यात यावे, अशी मागणीही सचिन गरड पाटील यांनी प्रशासनाकडे केली.

# विद्यार्थी नेतृत्वात छत्रपती संभाजीनगरचा झेंडा उंचावला; IIIT नागपूरच्या विद्यार्थी प्रशासन परिषदेच्या महासचिवपदी अपूर्व मुंदडा यांची निवड

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रासाठी अभिमानाची बातमी ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी *इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूर (IIIT Nagpur) येथील विद्यार्थी अपूर्व मुंदडा यांनी केली आहे. विद्यार्थी प्रशासन परिषद (Student Governance Council – SGC) निवडणूक २०२६–२७ मध्ये त्यांची *महासचिव (General Secretary)* या प्रतिष्ठेच्या पदावर निवड झाली असून, या यशामुळे संभाजीनगरच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एका मानाच्या पानाची भर पडली आहे.

अपूर्व मुंदडा हे छत्रपती संभाजीनगर (पैठण ) येथील ज्येष्ठ पत्रकार, संपादक अरुणकुमार एस. मुंदडा यांचे चिरंजीव आहेत. पत्रकारितेतील सामाजिक बांधिलकी, प्रामाणिकपणा आणि लोकहिताची परंपरा लाभलेल्या कुटुंबातील अपूर्व यांनी आपल्या गुणवत्तेच्या, नेतृत्वक्षमतेच्या आणि सातत्यपूर्ण परिश्रमांच्या बळावर देशातील नामांकित तंत्रज्ञान संस्थेत विद्यार्थी नेतृत्वाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली आहे.

IIIT नागपूरच्या निवडणूक समितीने जाहीर केलेल्या अधिकृत निकालानुसार, दि. २८ जुलै २०२६ रोजी शैक्षणिक इमारतीतील परिषद सभागृहात (Conference Hall) सर्व उमेदवार आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत निकाल जाहीर करण्यात आले. त्यानंतर हे निकाल संस्थेच्या ऑनलाइन माध्यमावरही प्रसिद्ध करण्यात आले. या निवडणुकीत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून लोकशाही मूल्यांवर आधारित, शांततापूर्ण आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेला यशस्वी केले.



सध्या तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेले अपूर्व मुंदडा हे केवळ अभ्यासातच नव्हे, तर नेतृत्वगुण, संघटन कौशल्य आणि विद्यार्थ्यांशी सातत्याने संवाद साधण्याच्या वृत्तीमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. प्रखर बुद्धिमत्ता, अपार मेहनत, सकारात्मक दृष्टिकोन आणि अत्यंत मनमिळावू स्वभाव ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा व्यापक विश्वास संपादन करण्यात त्यांना यश आले असून, महासचिवपदासाठी त्यांची निवड ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्यक्षमतेचा गौरव मानली जात आहे.

तंत्रज्ञान शिक्षणाबरोबरच विद्यार्थी कल्याण, शैक्षणिक गुणवत्ता, सांस्कृतिक उपक्रम, नवोपक्रम आणि संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांच्या हिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्याची जबाबदारी आता अपूर्व यांच्या खांद्यावर आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी प्रशासन परिषद अधिक परिणामकारक आणि विद्यार्थीकेंद्री कार्य करेल, असा विश्वास विद्यार्थी वर्गातून व्यक्त होत आहे.

अपूर्व मुंदडा यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल छत्रपती संभाजीनगरातील पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. विक्रांद टाइम्स/ अग्रसेन टाइम्स परिवारातर्फे अपूर्व मुंदडा यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक आणि नेतृत्वपूर्ण वाटचालीस हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. त्यांच्या या यशामुळे छत्रपती संभाजीनगरच्या नव्या पिढीसमोर कर्तृत्व, गुणवत्ता आणि नेतृत्वाचा प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## महापुरुषांच्या परिसरातील अतिक्रमण हटवून शहर अतिक्रमण मुक्त करा : विनायक रत्नपारखी



**माजलगाव :** शहरातील महापुरुषांच्या परिसरातील अतिक्रमण हटवण्यासाठी चालू असलेल्या महापुरुष स्मारक बचाव संघर्ष समिती उपोषणाला भाजपा शहर मंडलाचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी उपोषण स्थळी भेट देऊन जाहीर पाठिंबा दिला.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील विद्युत रोहित्र त्वरित स्थलांतरित करण्यात यावे, स्मारकाची रखडलेले विकास कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी तसेच स्मारकाभोवती संरक्षणात्मक भिंत उभी करून योग्य त्या उपाययोजना करणे , शहरातील सर्व नागरिकांना जमोकळा श्वास घेता यावा यासाठी अनेक वर्षापासून फक्त आश्वासनावर आश्वासन देऊन अतिक्रमणे हटत नाहीत ,त्यामुळे जोपर्यंत शहरातील अतिक्रमण हटवून अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत उपोषण चालूच राहील यासह सह विविध सर्व मागण्याला पाठिंबा असल्याचे भाजपा शहर मंडळ भाजपचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी उपोषण स्थळी बोलताना व्यक्त केले.

खरं तर माजलगाव शहरात अनेक वर्षापासून खूप प्रमाणात वरचेवर अतिक्रमण वाढतच असल्यामुळे नागरिकांना चालण्यासाठीतर अडचण होतच आहे परंतु अतिक्रमणामुळे घाणीचे साम्राज्य देखील होत आहे त्यामुळे या ठिकाणी महापुरुषांच्या स्मारकांचा देखील अपमान होत आहे त्यामुळे प्रशासनाने नागरिकांच्या भावनांचा आदर करून तत्काळ निर्णय घेऊन शहरातील अतिक्रमण हटवावे नसता शांततेच्या व लोकशाही मार्गाने चालू असलेल्या उपोषणाचे रूपांतर सर्वपक्षीय विविध संघटना यासह सर्व नागरिकांना सोबत घेऊन अतिक्रमण हटाव मोहिमेमध्ये उतरू असा प्रशासनाला इशारा यावेळी बोलताना भाजपा शहर मंडळ तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी दिला.

## पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

### चित्रकला स्पर्धेत दीड हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :** महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत भाजयुमो शहराध्यक्ष सुशील हरंगुळे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला व रंगभरण स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

माध्यमिक गटातील चित्रकला स्पर्धेत विद्यावर्धिनी विद्यालयाची विद्यार्थिनी माधवी मनोहर डहाळे हिने प्रथम क्रमांक मिळवून ५ हजार रुपये रोख व प्रमाणपत्र पटकाविले. कृष्णाबाई देशमुख विद्यालयाची सेजल अशोक इंगळे हिने द्वितीय क्रमांक मिळवत ३ हजार रुपये रोख व प्रमाणपत्र, तर सरस्वती विद्यालयाची प्रज्ञा प्रवीण सावंत हिने तृतीय क्रमांक मिळवत २ हजार रुपये रोख व प्रमाणपत्र मिळविले. विद्यावर्धिनी विद्यालयाची विद्यार्थिनी अलिशा गजेंद्र संघई हिला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

प्राथमिक गटातील रंगभरण



स्पर्धेत मिलिंद विद्यालयाची अक्षरा अमोल गायकवाड हिने प्रथम क्रमांक मिळवून ५ हजार रुपये रोख व प्रमाणपत्र मिळविले. वैष्णवी श्रीकांत वाघमारे हिने द्वितीय क्रमांक मिळवत ३ हजार रुपये रोख व प्रमाणपत्र, तर मिलिया प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी अलशिफा खमर शेख हिने तृतीय क्रमांक मिळवत २ हजार रुपये रोख व प्रमाणपत्र मिळविले.संस्कार प्राथमिक शाळेचा विद्यार्थी गजानन वैजनाथ गिरी याला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

यावेळी ना. पंकजाताई मुंडे यांनी स्पर्धेचे आयोजक भाजयुमो शहराध्यक्ष सुशील हरंगुळे यांचे अभिनंदन केले. तसेच सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे त्यांच्या उत्कृष्ट चित्रांसाठी कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

चित्रकला स्पर्धेच्या आयोजनास सहकार्य केल्याबद्दल शिक्षक भानुदास चव्हाण, शिवप्रसाद राजनाळे, व्हावळे, रवींद्र केंद्रे व सोमनाथ गोपणपाळे यांचा ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

दरम्यान, वाढदिवसानिमित्त भाजयुमो शहराध्यक्ष सुशील हरंगुळे, भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर, भाजयुमोचे आकाश देशमुख, पवन तोडकरी, श्रीपाद शिंदे, वैजनाथ रेकणे, दिलीप नेहरकर, संदीप बावगे व सखाराम डाके यांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे अभिष्टचिंतन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन भाजयुमो शहराध्यक्ष सुशील हरंगुळे यांनी केले.

### पंकजाताईकडून सुशील हरंगुळे यांच्या उपक्रमाचे कौतुक

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला व रंगभरण स्पर्धेबद्दल पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी भाजयुमो शहराध्यक्ष सुशील हरंगुळे यांचे विशेष कौतुक केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी हरंगुळे यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देत त्यांच्या पुढाकाराचे अभिनंदन केले. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा विधायक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## यूसूफवडगांवचे सुपुत्र श्री. सोमनाथ सिद्धलिंग आप्पा भुसारी यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती

**केज / प्रतिनिधी :** केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील रहिवासी व सध्या अंबाजोगाई येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक (डीवायएसपी) कार्यालयात कार्यरत असलेले श्री. सोमनाथ सिद्धलिंग आप्पा भुसारी यांची नुकतीच पोलीस खात्याच्या अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदी पदोन्नती झाली आहे.त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.



सोमनाथ भुसारी हे माजी पंचायत समिती सदस्य उमाकांत भुसारी यांचे ज्येष्ठ बंधू असून, 1993 साली बीड येथे झालेल्या पोलीस भरती प्रक्रियेत त्यांची निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे पोलीस प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. प्रशिक्षणानंतर काही काळ त्यांनी बीड पोलीस मुख्यालयात सेवा बजावली. त्यानंतर त्यांची अंबाजोगाई पोलीस ठाण्यात नियुक्ती झाली. अंबाजोगाई येथे त्यांनी ग्रामीण व शहर पोलीस ठाण्यात सलग दहा वर्षे उल्लेखनीय सेवा बजावली.

सेवाकाळात त्यांना किडनीसंबंधित गंभीर आजाराचा सामना करावा लागला. या आजारामुळे त्यांच्या आयुष्यात कठीण काळ आला; मात्र सर्व बंधू आणि कुटुंबीयांच्या भक्कम पाठिंब्यामुळे त्यांनी या गंभीर आजारावर यशस्वीपणे मात करत पुन्हा पोलीस सेवेत रुजू होऊन कर्तव्यनिष्ठेने सेवा सुरू ठेवली.

त्यानंतर त्यांनी सुमारे दहा वर्षे डीवायएसपी कार्यालय, अंबाजोगाई येथे, त्यानंतर पाच वर्षे बर्दापूर पोलीस ठाण्यात सेवा बजावली. सध्या ते सहाय्यक पोलीस अधीक्षक कार्यालय, अंबाजोगाई येथे कार्यरत आहेत.

दि. 30 जुलै रोजी पोलीस खात्याने जाहीर केलेल्या पदोन्नती यादीत त्यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली. याबद्दल त्याबद्दल सत्कार करण्यात आला यावेळी माजी मेजर श्रीमंत तोडकर,विकास जाधव यांची उपस्थिती होती.

## बीडमध्ये खुनाच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत मागितली वीस लाखांची खंडणी

**बीड, 02 ऑगस्ट :** नैसर्गिक मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या नातेवाईकांनी एका तरुणावर हत्येचा खोटा गुन्हा दाखल करण्याची भीती घालून वीस लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पाच जणांविरोधात अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोखंडी सावरगाव येथील मटण विक्रेते मुख्तार कय्युम कुरेशी (वय ६०) यांनी या प्रकरणी तक्रार दिली आहे. त्यानुसार, इसामिया मोसा कुरेशी या व्यक्तीचा अतिमद्यपानामुळे नैसर्गिक मृत्यू झाला होता. मात्र या घटनेचा गैरफायदा घेत मृत इसामिया याचे नातेवाईक शफी बाबू कुरेशी (वय ६०, रा. गातेगाव, जि. लातूर), अमीन कुरेशी (रा. सोनपेठ, जि. परभणी), जबीन इसामिया कुरेशी (वय ४०), फैजान इसामिया कुरेशी (वय २३) आणि मोहम्मद इसामिया कुरेशी (वय २१, सर्व रा. बाराबाई गल्ली, अंबाजोगाई) यांनी संगनमत केले.

अर्षकॉलनी येथे भरलेल्या न्यायपंचायतीत आरोपींनी तक्रारदाराच्या मुलावर व त्याच्या मित्रावर हत्येचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन २० लाखांची मागणी केली. पैसे देण्यास असमर्थता दर्शवली असता आरोपींनी अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. विशेष म्हणजे आरोपींनी मृतदेह पोलीस ठाण्यासमोर नेऊन धरणे आंदोलन केले. त्यानंतर पोलिसांनी दिलेल्या निर्देशानुसार मृतदेह दफन करण्यात आला असला तरी, आरोपींनी खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन मानसिक त्रास कायम ठेवला व जबरदस्तीने रक्कम वसूल करण्याचा प्रयत्न केला.

## केज पोलिसांचा अवैध दारू व्यवसायाला दणका; 74 हजार 720 रुपयांचा मुद्देमाल जप्त

**बीड, 02 ऑगस्ट :** केज पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध दारू विक्रीविरोधात धडक कारवाई करत सुमारे ₹७४ हजार ७२० किमतीचा देशी-विदेशी मद्यसाठा जप्त केला असून एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ ऑगस्ट २०२६ रोजी केज पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे हे पथकासह हद्दीत पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. उत्तरेश्वर पिंपरी येथील मंदिरासमोरील विजय हॉटेल परिसरात विनापरवाना देशी व विदेशी दारूची चोरटी विक्री सुरू असल्याची माहिती मिळताच त्यांनी ही बाब पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या निदर्शनास आणून दिली.

## सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या दोन महान विभूतींना न्यू व्हिजन पब्लिक स्कूलमध्ये अभिवादन

### साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त प्रेरणादायी परिपाठ ; विद्यार्थ्यांनी उलगडला विचारांचा जागर

**अंबाजोगाई :** श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल, अंबाजोगाई येथे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे अग्रणी नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रेरणादायी परिपाठाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समता, सामाजिक न्याय, राष्ट्रप्रेम आणि कर्तव्यनिष्ठेचा संदेश देणाऱ्या या दोन महान विभूतींच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा जागर घडवून आणला.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, व्यवस्थापकीय संचालक संकेत मोदी, कार्यकारी संचालिका सौ.डिंपल मोदी, मार्गदर्शक प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, माजी उपप्राचार्य वसंतराव चव्हाण, माजी प्राचार्य चंद्रकांत गायकवाड, प्राचार्य विनायक मुंजे, प्रा.राघवेंद्र राजमान्य, मुख्याध्यापक प्रदीप सोनी, समन्वयक रवींद्र राजगुरू, त्रिपाठी जयशंकर, शारदा शिंदे, नितीन गोपाळे, शिल्पा शिंदे, स्नेहल पाटील, सांस्कृतिक विभाग समन्वयक सुचिता दहिफळे तसेच परिपाठ प्रमुख श्री. केतेश्वरण यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे नियोजन परिपाठ प्रमुख श्री. केतेश्वरण, सांस्कृतिक विभाग



समन्वयक सुचिता दहिफळे व शिक्षकवृंद यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी भाषणे, विचारमंथन आणि विविध सादरीकरणांद्वारे या महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकार्याचा प्रभावी परिचय उपस्थितांसमोर करून दिला.

परिपाठामध्ये इयत्ता सातवीचा विद्यार्थी विवेक फड याने साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवास, साहित्यसंपदा, सामाजिक परिवर्तनासाठी केलेले कार्य आणि समतेच्या विचारांचा प्रभावी आढावा घेत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या साहित्याने वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजघटकांना दिलेला आवाज तसेच सामाजिक न्यायासाठी त्यांनी दिलेले योगदान यावर त्याने विशेष प्रकाश टाकला. याचबरोबर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्यलढ्यातील नेतृत्व, शिक्षण, पत्रकारिता आणि समाजजागृतीतील योगदानाचा प्रेरणादायी परिचय विद्यार्थ्यांना करून देण्यात आला.

## लो टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाही अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त स्व. सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड मध्ये अभिवादन



**बीड (प्रतिनिधी) :** स्वा सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड मध्ये लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अभिवादन कार्यकम आयोजित करण्यात आला .

या महापुरुषाच्या चरित्रातून व कार्यातून शिकवण म्हणते लेखनीच्या सामर्थ्यान समाज जागृती त्यांनी केली व समाजास दिशा दिली . प्रा कल्याण मोदाळे यांनी लोकमान्य टिळक यांचे चरित्रातील प्रसंग सांगितले व प्रा शशिकांत पसारकर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन चरित्र विषय मांडणी केली .

यावेळी प्रमुख उपस्थिती पर्यवेक्षक हरीभाऊ साबळे, विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे प्रा दीपक देशमुख, प्रा विठ्ठल वाघीरकर, वक्ते प्रा कल्याण मोदाळे , प्रा पसारकर व प्राध्यापक वृंद विद्यार्थी यांची होती . ज्ञानोपासक मंडळ व संस्कार मंडळ विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले प्रा संतोष जोशी यांनी सूत्रसंचलन व आभार व्यक्त केले .

## नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**बीड :** सर्वप्रथम प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमासाठी विभाग प्रमुख आरतीताई कंपू, अध्यक्ष म्हणून शुभंकर जोशी व प्रमुख पाहुणे वेद घोडके हे लाभले होते... विद्यार्थ्यांनी या दोन्ही महामानवाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये निधीश पांडे, मृणाल पवार. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य च्या लढ्यात दिलेले योगदान हे मोलाचे होते त्यांनी स्वदेशीचा विचार मांडला आज आपण सगळ्यांनी स्वदेशी वस्तू निर्मिती, विक्री व



खरेदी सर्वांनी करावी व आपल्या भारत देशाला बलशाली करावे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सारखे आपण कलात्मक आणि कार्यात्मक झाले पाहिजे.. त्यांची फकिरा ही कादंबरी प्रसिद्ध आहे. ते प्रसिद्ध मराठी साहित्यिक , समाजसुधारक आणि लोककवी होते. त्यांच्यामधील अनेक गुण, कौशल्य आपण आत्मसात केले पाहिजे.. जगदाळे ताई व क्रांतीताई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.. गार्गी वखरे या विद्यार्थिनीने आभार व्यक्त केले. सर्व शिक्षक वृंद यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले..

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती व लो.टिळक स्मृतिदिन साजरा

**माजलगाव प्रतिनिधी :** सुंदरराव सोळंके महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन के मुळे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते आणि प्रबंधक डॉ.



प्रशांत चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. एन. के. मुळे म्हणाले की,अण्णाभाऊ साठे यांनी साहित्यातून बहुजन नायक निर्माण केल्याचे सांगून अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाचा तसेच लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील कार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षण, राष्ट्रप्रेम, सामाजिक समता आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचा स्वीकार करावा, असे त्यांनी सांगितले.

उपप्राचार्य डॉ.एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते आणि प्रबंधक डॉ. प्रशांत चव्हाण यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या समतेच्या विचारांचे आणि लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रभक्ती, स्वराज्याच्या संकल्पनेचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आजीवन शिक्षण विभागाच्या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी : डॉ. अश्विन रांजणीकर

**माजलगाव, प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अल्पकालीन कौशल्याधारित अभ्यासक्रमांमुळे युवक-युवतींना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत असल्याचे प्रतिपादन विभागाचे संचालक डॉ. अश्विन रांजणीकर यांनी केले.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित शिबिर उद्घाटन व



प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी होते. यावेळी अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव व ग्रंथपाल प्रा. सुरेश बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. रांजणीकर यांनी फार्मसी, ब्युटीशियन, ग्रामीण पत्रकारिता, बालवाडी-अंगणवाडी सेविका, बँकिंग आदी कौशल्याधारित अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यापीठाने आतापर्यंत सुमारे ४० हजार महिला व युवकांना प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविल्याची माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. देवर्षी यांनी विद्यार्थ्यांनी कौशल्यविकासावर भर देत स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सीताराम इंगोले यांनी केले तर आभार ग्रंथपाल प्रा. सुरेश बनसोडे यांनी मानले. या कार्यक्रमास आजीवन शिक्षण विस्तार सेवा विभागाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## नानाजी देशमुख विद्यामंदिर इसवी सन 2026_27 या वर्षातील इयत्ता पहिली ते चौथीची पालक शिक्षक सहविचार सभा संपन्न

**बीड :** शैक्षणिक वर्ष 2026 27 या वर्षातील इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गाचा पालक मेळावा संपन्न झाला. त्यामध्ये मा. डॉक्टर सीमाताई जोशी, मा.देशमुख सर, मा. श्रीमती.सुनंदाताई कुलकर्णी, मा.डॉ. मधुराताई कुलकर्णी, मुख्याध्यापिका मा.अर्चनाताई मोराळे, विभाग प्रमुख मा.आरतीताई जोशी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोराळे ताई व आरती ताई यांनी केले. यानंतर पालक परिचय घेण्यात आला. व चर्चासत्राला सुरुवात झाली पालकांनी आपले प्रश्न, विद्यार्थी संदर्भात अडचणी निःसंकोचपणे मांडल्या तसेच तसेच त्यांना वाटणाऱ्या चांगल्या गोष्टी देखील व्यक्त केल्या. डॉक्टर मधुरा ताई कुलकर्णी यांनी पालकांना मार्गदर्शन केले त्यामध्ये विद्यार्थ्यांवर प्रयोग करण्यासाठी पालकांना काही उपक्रम सुचवले. सीमाताई जोशी यांनी अध्यक्षीय समारोप केला." नमो मातृभूमी" या प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाचे आभार सोनसाळेताई व कुलकर्णीताई यांनी मानले. कार्यक्रमासाठी मार्गदर्शन ॲड. अर्चनाताई तुंगार यांचे लाभले. सर्व शिक्षक वृंद व इतर कर्मचारी यांच्या सहकार्याने पालक मेळावा व्यवस्थितरित्या संपन्न झाला.

# भोंदू खरातला सात दिवसांची पोलिस कोठडी

## न्यायालयाचा सात दिवसांच्या कोठडीचा आदेश

**शिर्डी (प्रतिनिधी ) :** समता सहकारी पतसंस्थेतील कथित बोगस खाते प्रकरणातील प्रमुख आरोपी भोंदू खरात याला शनिवारी न्यायालयाने सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. सुनावणीदरम्यान बचाव पक्ष आणि सरकारी पक्षात जोरदार युक्तिवाद झाला.

बचाव पक्षाने न्यायालयात मांडले की, आरोपीने कोणतीही बनावट कागदपत्रे वापरून कर्ज घेतलेले नाही. संबंधित खात्यांतील रकमेवर कोणत्याही खातेदाराने दावा केलेला नसून व्यवहारांबाबतही कोणतीही तक्रार नाही. खातेदारांचे आर्थिक नुकसान अथवा प्रतिष्ठेला धक्का बसल्याचेही निष्पन्न झालेले नाही. फिर्यादीचे नेमके नुकसान काय झाले, हेही स्पष्ट करण्यात आलेले नाही, असा दावा बचाव पक्षाने केला.

याशिवाय, चार महिन्यांपासून तपास सुरू असताना पोलिसांनी काय कारवाई केली, असा सवाल उपस्थित करण्यात आला. पतसंस्थेच्या व्यवस्थापकाविरुद्धही गुन्हा दाखल असून त्याच्या चौकशीतून अनेक बाबी समोर आल्या असत्या. मात्र, व्यवस्थापकाला मोकळे सोडून आरोपी भोंदू खरात यांना ओढूनताणून या प्रकरणात गोवले जात असल्याचा आरोप बचाव पक्षाने केला.

सरकारी पक्षाने मात्र या सर्व युक्तिवादाला विरोध केला. खाते उघडण्याची जबाबदारी व्यवस्थापकाची असली तरी त्यालाही आरोपी करण्यात आल्याचे सरकारी वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. आरोपींच्या कृत्यामुळे संस्थेची प्रतिष्ठा आणि मालमत्तेचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला. फसवणुकीच्या उद्देशानेच कागदपत्रे वापरण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असून, या प्रकरणात सहभागी असलेल्या इतर व्यक्तींचा तपास करण्यासाठी आरोपीची पोलिस कोठडी आवश्यक असल्याचे सरकारी पक्षाने सांगितले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी भोंदू खरात याला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या कालावधीत पोलिसांकडून प्रकरणाचा पुढील तपास करण्यात येणार आहे.

# एकाचवेळी 23 नगरसेवक होणार बाद? 'या' मनपात मोठा राजकीय भूकंप; भाजप, MIMला धक्का

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महापालिकेत सर्वात मोठा राजकीय भूकंपा होण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे तब्बल २३ नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार लटकली आहे. मनपा प्रशासनाकडून एकूण २३ नगरसेवकांना अपात्रतेच्या नोटीसा पाठवण्यात आल्या असून सत्ताधारी अन् विरोधकांचे दिग्गज नेते अडकल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, छत्रपती संभाजीनगर महापालिका मनपा प्रशासनाने सत्ताधारी भाजपच्या ७ आणि विरोधी पक्ष असलेल्या एमआयएमच्या तब्बल १६ अशा एकूण २३ नगरसेवकांना अपात्रतेच्या नोटीसा बजावल्या आहेत. यामध्ये विरोधी पक्षनेत्यांसह अनेक मातब्बर नगरसेवकांचा समावेश असल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ माजली आहे.

निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांनी पुराव्यानिशी केलेल्या तक्रारींनंतर नगर सचिव, जन्म-मृत्यू आणि अतिक्रमण विभागाने प्राथमिक चौकशी केली. तर, प्राथमिक चौकशी अहवाल प्राप्त होताच प्रशासनाने एकाच दिवशी २३ नगरसेवकांना एकूण ३७ नोटीसा धाडून स्पष्टीकरण मागवले आहे. नोटीस मिळाल्यानंतर भाजप आणि एमआयएम या दोन्ही प्रमुख पक्षांच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे.

विशेष म्हणजे प्रशासनाने सर्व २३ नगरसेवकांना आपले म्हणणे आणि पुरावे सादर करण्यासाठी अंतिम संधी दिली आहे. ऑगस्ट महिन्यात १७ आणि २४ तारखेला, तर सप्टेंबरमध्ये ७ आणि १५ तारखेला या प्रकरणांवर प्रत्यक्ष सुनावणी पार पडणार आहे. एका दिवशी १० नोटीसांवर सुनावणी घेतली जाईल. सुनावणी दरम्यान संबंधित नगरसेवकांनी ठोस कागदपत्रांसह आपली बाजू मांडली नाही, तर महापालिका प्रशासन थेट 'एकतर्फी निर्णय' घेईल, असा थेट इशारा नोटीशीद्वारे देण्यात आला आहे.

# हृदयविकाराचा झटका आलेल्या महिलेचा वाहकाने वाचवला जीव

**छत्रपती संभाजीनगर, 02 ऑगस्ट :** छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बसस्थानकात एका महिला प्रवाशाला अचानक हृदयविकाराचा झटका येऊन ती बेशुद्ध पडली. यावेळी वाहक संगीता पालवे यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ सीपीआर देण्यास सुरुवात केली. सुरक्षारक्षक कविता भुतेकर यांनीही मदत केली. वेळेत मिळालेल्या प्राथमिक उपचारांमुळे महिलेची श्वसनक्रिया पूर्ववत होण्यास मदत झाली. त्यानंतर तिला तातडीने शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले.

# खुलताबाद पंचायत समितीचे गट विकास अधिकारी प्रकाश नाईक यांचा सन्मान आणि सेवापूर्ती सोहळा

तभा वृत्तसेवा

**खुलताबाद प्रतिनिधी :** खुलताबाद तालुक्यासाठी प्रशासकीय सेवेत आपल्या प्रामाणिक आणि कर्तव्याशी एकनिष्ठ कारकिर्दीची यशस्वी वाटचाल पूर्ण करून, गटविकास अधिकारी वर्ग १ . प्रकाश वसंतराव नाईक शासनाच्या नियमाप्रमाणे दि ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त सन्मान सोहळा

प्रकाश. नाईक आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय कारकिर्दीत खुलताबाद पंचायत समितीमध्ये शासकीय कामासाठी आपल्या कामानिमित्त येणार् नागरिकांना सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आणि कायम स्मरणात राहणारे आहे




पंचायत समिती स्तरावर अत्यंत महत्त्वाचे समजले जाणारे रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या विहिरी. गाय गोठे रस्ते शेवगा लागवड. घरकुल बचत गट अपंगासाठी असलेले विविध योजना या प्रभावीपणे शासनाच्या नियमाप्रमाणे राबवून लाभार्थ्यांना शासकीय योजने चा लाभ मिळवून देण्यासाठी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या उपस्थितीत लाभार्थी मेळावा शिबिर व योजनेचे मंजूर प्रमाणपत्र वाटप करून एक आदर्श निर्माण केला यात एम आर ई जी एस कार्यक्रम अधिकारी अभिजीत गायकवाड यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी विशेष सहभाग नोंदवला

एक शिस्तप्रिय, जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारा आणि तळमळीने काम करणारे अधिकारी म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. प्रशासकीय सेवेत असताना त्यांनी अनेक लोक उपयोगी विकास कामे यशस्वीपणे मार्गी लावली आणि नेहमीच सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

प्रशासनातील अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी योग्य समन्वयाने काम केल्यास शासनाच्या योजनांचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत कसा पोहोचू शकतो, याचे उत्तम आणि अनुकरणीय उदाहरण म्हणजे प्रकाश वसंतराव नाईक खुलताबाद पंचायत समिती गट विकास अधिकारी म्हणून कारकीर्द आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून समतेच्या विचारांची क्रांती - बाळासाहेब थोरात



**राहाता ( वार्ताहर ) :** लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राहाता येथील काँग्रेस कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्राचे मा. महसूलमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी काँग्रेस कार्यालयास भेट देऊन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोठे योगदान असून त्यांच्या साहित्यातून समितीची क्रांती झाली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यावेळी ॲड. पंकज लोंढे, उत्तमराव मते, विक्रांत दंडवते, राजेंद्र निर्मळ, बाळासाहेब खर्डे, अमोल आरणे, रमेश गागरे, संदीप कोकाटे, साहिल म्हस्के, सदाशिव गाडेकर, शिवप्रसाद आहेर, सतीश काळे, विशाल वाघमारे, बबनराव नळे, मुन्नाभाई, अमोल बनसोडे, राजेंद्र आग्रे तसेच काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते.

यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांतून समता, सामाजिक न्याय, बंधुता आणि मानवतेचा संदेश आजही समाजाला प्रेरणा देत असल्याचे सांगितले.

# एमजीएममध्ये राष्ट्रीय प्राकृत भाषा परिषद यशस्वीपणे संपन्न



**छत्रपती संभाजीनगर, दि.१ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या भारतीय तथा विदेशी भाषा संस्था आणि केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने वीरशासन जयंतीनिमित्त आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय प्राकृत परिषदेचा समारोप समारंभ विद्यापीठाच्या आईनस्टाईन सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. ‘लोकभाषा प्राकृत : भारतीय विचार-परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचा ठेवा’ या विषयावरील या परिषदेत देशभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि प्राकृत भाषा अभ्यासक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचे प्रा. डॉ.वीरसागर जैन, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे प्रा.डॉ.श्रीयंश कुमार सिंघाई, प्रा.संजय मोहोड, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, संचालक डॉ.के.पी. सिंह, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. वीरसागर जैन म्हणाले, मी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागी झालो आहे; मात्र एमजीएम विद्यापीठातील ही परिषद कायम स्मरणात राहील. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वांनी उत्स्फूर्तपणे आपले विचार मांडले.

# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक ईसीएमओ मशीनची सुविधा सुरू

## अत्यवस्थ हृदय व फुफ्फुसाच्या रुग्णांसाठी जीवनदायी उपचार उपलब्ध

**छत्रपती संभाजीनगर :** गंभीर हृदयविकार, फुफ्फुस निकामी होणे, तीव्र न्यूमोनिया, सेप्सिस, सर्पदंश विशिष्ट विषबाधा ,हृदयविकाराचा झटका किंवा जटिल हृदय शस्त्रक्रियेनंतर अत्यवस्थ झालेल्या रुग्णांना जीवनदान देण्यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक ईसीएमओ (एक्स्ट्राकॉर्पोरियल मेम्ब्रेन ऑक्सीजनेशन) मशीनची सुविधा सुरू करण्यात आली आहे. डॉ मनीष पुराणिक, हृदय शल्यचिकित्सक यांनी सांगितले की



ईसीएमओ ही अत्याधुनिक जीवनरक्षक प्रणाली असून, रुग्णाचे हृदय किंवा फुफ्फुसे तात्पुरती कार्य करू शकत नसतील तर हे यंत्र कृत्रिमरीत्या रक्ताला ऑक्सिजन पुरवून शरीरात परत पाठवते. त्यामुळे हृदय व फुफ्फुसांना विश्रांती मिळून त्यांना बरे होण्यासाठी वेळ मिळतो. ही उपचारपद्धती अत्यंत गंभीर आणि निवडक रुग्णांसाठी वापरली जाते. हृदय व फुफुसांच्या गंभीर आजारांमध्ये ह्या अवयवांना मदत करून त्यांची अधिकची झीज ईसीएमओ च्या वापराने टाळता येऊ शकते.

यावेळी मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. विशाल कुटे म्हणाले, "मराठवाड्यातील रुग्णांना अत्याधुनिक आणि वेळेवर उपचार मिळावेत, हा आमचा प्रयत्न आहे. ईसीएमओ सारखी सुविधा उपलब्ध झाल्यामुळे अनेक गंभीर रुग्णांना उपचाराची नवी आशा मिळणार आहे." हृदयरोग, क्रिटिकल केअर, कार्डिओथोरॅसिक सर्जरी, भूलतज्ज्ञ, परफ्युजनिस्ट, प्रशिक्षित नर्सिंग व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या अनुभवी टीमद्वारे ही सेवा 24x7 उपलब्ध राहणार आहे. ईसीएमओ सुविधा सुरू झाल्यामुळे गंभीर रुग्णांना उपचारासाठी इतर महानगरांमध्ये जाण्याची गरज कमी होणार असून, योग्य वेळी उपचार मिळाल्यास अनेकांचे प्राण वाचविणे शक्य होईल.

# एमजीएममध्ये 'वर्ल्ड वाईड वेब दिन' उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर, दि.२ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीच्या वतीने ‘वर्ल्ड वाईड वेब’ दिनाच्या निमित्ताने चेकमार्क्सचे रिसर्च अँड डेव्हलपमेंट प्रमुख श्रीनिवास धांडे यांच्या ‘एआय अँड सायबर सिक्युरिटी : इमर्जिंग ट्रेंड्स अँड फ्युचर जॉब प्रॉस्पेक्ट्स' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आज रुक्मिणी सभागृह येथे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अधिष्ठाता डॉ.एच.एच.शिंदे, संचालिका डॉ.शर्वरी तामणे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना श्रीनिवास धांडे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील सध्याचे तसेच उदयोन्मुख तंत्रज्ञान विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितले. त्यांनी एजेंटिक एआय, लार्ज लँग्वेज मॉडेल्स, एआय इपॉक यांसारख्या आधुनिक संकल्पनांची सविस्तर माहिती दिली. तसेच एजेंटिक एआयच्या विविध अनुप्रयोगांवर प्रकाश टाकत भविष्यातील तांत्रिक बदलांसाठी विद्यार्थ्यांनी आतापासूनच स्वतःला तयार ठेवण्याचे आवाहन केले.

फॉरवर्ड डिप्लॉइड इंजिनिअर, एआय ऑर्केस्ट्रेटर आणि एआय सिक्युरिटी रिसर्चर यांसारख्या भविष्यातील रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहेत. सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील वेगवान तांत्रिक विकास, वाढत्या सायबर हल्ल्यांचे प्रमाण आणि गुंतागुंतीच्या संगणकीय संरचनांमुळे आपल्यासमोर आव्हाने निर्माण झाली आहेत. डेटा ॲनालिटिक्ससाठी आवश्यक साधनांचे ज्ञान, सांख्यिकी विषयावर प्रभुत्व आणि मूलभूत संकल्पनांवरील भक्कम पकड ही यशस्वी करिअरसाठी अत्यावश्यक असल्याचे श्री. धांडे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालिका डॉ. शर्वरी तामणे यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार प्रा.मोहसीन अंसारी यांनी मानले.

# आदिशक्ती अभियानात घोसला ग्रामपंचायतीची सोयगाव तालुक्यात प्रथम तर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक

## 4 लाख रुपयांचे बक्षीस

तभा.वृत्तसेवा

सोयगाव, दि.१ ऑगस्ट

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या अत्यंत महत्त्वाकांक्षी 'आदिशक्ती अभियान २०२५-२६' अंतर्गत सोयगाव तालुक्यातील घोसला ग्रामपंचायतीने उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. सोयगाव तालुक्यातील घोसला ग्रामपंचायतीने सोयगाव तालुक्यात प्रथम क्रमांक (रु. १ लाख), तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक (रु. ३ लाख) पटकावून एकूण ४ लाख रुपयांच्या बक्षीसासह मानाच्या 'आदिशक्ती पुरस्कारा'वर आपले नाव कोरले आहे.महिला व बालविकास विभागाने ३१ जुलै २०२६ रोजी या पुरस्कारांची अधिकृत घोषणा केली.

पुरस्कार व विजेत्या ग्रामपंचायतींचा तपशील

**शासनाच्या धोरणानुसार अभियानात अतिउत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना जाहीर झालेली बक्षीस रक्कम खालीलप्रमाणे आहे:**

**१,सोयगाव तालुकास्तरीय निकाल:**

**प्रथम क्रमांक:** घोसला ग्रामपंचायत १,००,०००

**द्वितीय क्रमांक:** शिंदोळ




ग्रामपंचायत ५०,०००

**तृतीय क्रमांक:** जरंडी ग्रामपंचायत २५,०००

**२, नाही छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरीय निकाल:**

**प्रथम क्रमांक:** शिंदोळ ग्रामपंचायत ५,००,०००

**द्वितीय क्रमांक:** घोसला ग्रामपंचायत ३,००,०००

**तृतीय क्रमांक:** एकलहरा ग्रामपंचायत १,००,०००

**(माहितीसाठी:** राज्यस्तरावर प्रथम पुरस्कार १० लाख, द्वितीय ७ लाख आणि तृतीय ५ लाख रुपये असा निश्चित करण्यात आला आहे.)

'या' कामगिरीमुळे मिळाला सन्मान

गावातील महिलांचे आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक व आरोग्यविषयक सबलीकरण करणे,कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना,बालविवाह प्रतिबंध आणि शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना तळागाळातील महिलांपर्यंत यशस्वीपणे पोहोचविल्याबद्दल घोसला ग्रामपंचायतीचा हा विशेष गौरव करण्यात आला आहे.सर्वसमावेशक सहकार्यातून मिळाले यश

**या यशाबाबत आनंद व्यक्त करताना ग्रामपंचायतीच्या वतीने सांगण्यात आले की:**

"गावातील आजी-माजी सरपंच,सर्व सन्माननीय सदस्य, पोलीस पाटील,तंटामुक्त अध्यक्ष,ग्रामसेवक,अंगणवाडी सेविका,आशा स्वयंसेविका,महिला बचत गट आणि समस्त घोसला ग्रामस्थांच्या अखंड मेहनत,मार्गदर्शन व मोलाच्या सहकार्यामुळेच हे ऐतिहासिक यश मिळवणे शक्य झाले आहे."पुरस्कार रक्कमेचा महिला विकासासाठी विनियोग

शासकीय नियमानुसार प्राप्त होणाऱ्या या पुरस्कार रक्कमेचा (एकूण ४ लाख रुपये) उपयोग ग्रामपंचायतीमार्फत गावात महिला सक्षमीकरण,आरोग्य, शिक्षण व महिलांच्या सर्वांगीण विकासाच्या विविध नाविन्यपूर्ण योजना राबवण्यासाठी केला जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

घोसला ग्रामपंचायतीच्या या अलौकिक यशामुळे गावाचा मान संपूर्ण जिल्ह्यात उंचावला असून,परिसरातून ग्रामपंचायत पदाधिकारी,महिला कार्यकर्ते व ग्रामस्थांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


# एक नवा प्रवास, एक नवी कथा; ; एस एस फिल्म प्रोडक्शन' कडून मराठी सिनेरसिकांसाठी सरप्राईज




छत्रपती संभाजीनगर - मराठी चित्रपटसृष्टीत आणखी एका वेगळ्या आणि आशयघन चित्रपटाची भर पडणार असून, 'एस एस फिल्म प्रोडक्शन' एका नव्या मराठी चित्रपटाची निर्मिती करत आहे. अर्थात हा नवा चित्रपट कोणता असणार आहे याची उत्सुकता असून, निर्माते शरद पाटील आणि अंजली पाटील यांनी या चित्रपटाच्या निर्मितीची धुरा पेलवली आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची, कथेची धुरा संवेदनशील आणि वैशिष्ट्यपूर्ण मांडणीसाठी ओळखले जाणारे दिग्दर्शक चेतन चावडा यांनी सांभाळली आहे. तर नितीन चव्हाण हे चित्रपटाचे लेखक आहेत. तर चित्रपटाला सुरेल आणि दमदार संगीताची साथ लाभणार असून, संगीतकार साई–पियुष ही जोडी चित्रपटातील संगीताची जबाबदारी सांभाळत आहेत. या चित्रपटाचे प्रोडक्शनचे काम मेटाएफएक्स कंपनीचे मुकुल नाळे आणि टीम करत आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाचे नाव, कलाकार आणि कथा अद्याप गुप्त ठेवण्यात आली आहे. मात्र निर्मात्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा चित्रपट मराठी प्रेक्षकांना एक वेगळा अनुभव देणारा, आशय आणि सादरीकरणाच्या दृष्टीने हटके असणार आहे. त्यामुळे चित्रपटाविषयीची उत्सुकता अधिकच वाढली आहे. आजच्या मराठी चित्रपटसृष्टीत नवनवीन विषय, तांत्रिक दर्जा आणि दर्जेदार सादरीकरणाला प्रेक्षकांची पसंती मिळत असताना, एस एस फिल्म प्रोडक्शन हा आगामी चित्रपटही त्याच परंपरेत एक वेगळी ओळख निर्माण करेल, असा विश्वास निर्मात्यांकडून व्यक्त केला आहे.

# देवगिरी महाविद्यालयात पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसच्या सहकार्याने ‘AI Beyond’ सेमिनार व उपग्रह मॉडेल निर्मिती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पस यांच्या सहकार्याने ‘AI Beyond’ सेमिनार व उपग्रह मॉडेल निर्मिती कार्यशाळा २०२६–२७ उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडली. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि अवकाश विज्ञानाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, तसेच त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.





कार्यक्रमाची सुरुवात पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसच्या टीमने कार्यक्रमाची रूपरेषा, उद्दिष्टे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व अवकाश तंत्रज्ञानातील भविष्यातील संधी यांची ओळख करून देत केली.

यानंतर ‘AI Beyond’ या विषयावर अफशान खान यांनी प्रमुख वक्त्या म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलतत्त्वे, शिक्षण, आरोग्य, उद्योग, संशोधन, ऑटोमेशन तसेच भविष्यातील करिअरच्या संधी याविषयी सविस्तर माहिती दिली.

सेमिनारमधील विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या ‘Meditation App’चे सादरीकरण होय. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने मानसिक आरोग्य आणि तणाव व्यवस्थापनासाठी तयार करण्यात आलेल्या या ॲपची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

त्यानंतर उपग्रह मॉडेल निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. डॉ. वंदना जाधवपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. प्रियांका साह यांनी कार्यशाळेचे समन्वयन केले, तर पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसचे Outreach Officer विकास राजपूत यांनी विद्यार्थ्यांना उपग्रहाची रचना, कार्यपद्धती, उपग्रह संप्रेषण, अवकाश मोहिमा आणि आधुनिक अवकाश तंत्रज्ञान याविषयी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने उपग्रहांची मॉडेल्स तयार करून प्रत्यक्ष अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना Satellite Model Making Website ची माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमात एकूण 170 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या शेवटी पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. विविध उपक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. रवी पाटील यांनी अध्यक्षीय समारोप करताना विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, वैज्ञानिक संशोधन, नवोपक्रम आणि अवकाश संशोधनाचा स्वीकार करून भविष्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन केले.

उपप्राचार्य प्रा. अरुण काटे यांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे, शिक्षकांच्या अथक परिश्रमांचे तसेच पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसच्या टीमच्या मोलाच्या सहकार्याचे विशेष कौतुक केले. त्यांनी अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी नियोजन, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी विशेष परिश्रम घेतले.

# बेदखल बदलाचा 'बदला'!

## रोखठोक

दिनेश गुणे

शहरीकरण आणि जागतिकीकरणामुळे समाजाच्या जीवनशैलीमध्ये जे काही बदल होत गेले, त्यामध्ये आचार संस्कृतीबरोबरच आहार संस्कृतीचादेखील समावेश होतो. जागतिकीकरणामुळे खाद्यसंस्कृतीनेही पारंपरिक आणि भौगोलिक सीमारेषा ओलांडल्या आणि जाहिरातींच्या जगाने दृक-श्राव्य माध्यमांचे बोट धरून जागतिक खाद्यसंस्कृतीला घरोघरी पोहोचविले. जाहिरातींचा समाजमनावर प्रचंड पगडा असल्याने, जाहिरातीतून सांगितले जाते ते सारेच चांगले असा समज समाजात पसरत गेला. एकदा मनावर ताबा मिळविला, की विचारांची दिशा हवी तशी वळविता येते, हे जाहिरात क्षेत्राचे गुपित असते. त्यामुळे मनावर ताबा मिळविण्याची जाहिरातींची किमया संथ असली, तरी सहसा अपयशी ठरत नाही हे स्पष्ट झाल्यावर जागतिक आहारसंस्कृतीने जाहिरातींच्या माध्यमातून घराघरात प्रवेश केला आणि जेवणाच्या पारंपरिक पद्धती हद्दपार झाल्या. जीवनशैलीतील या बदलाचे सूक्ष्म निरीक्षण केले, तर गेल्या शतकभरात माणसाच्या कौटुंबिक राहणीमानात होत गेलेल्या बदलाचे टप्पेदेखील मनोरंजक आणि कदाचित, चिंताजनक देखील वाटू लागतात. गेल्या काही दशकांत संपर्क माध्यमांच्या क्षेत्रात अनाकलनीय वेगाने क्रांती झाली, दळणवळणाच्या साधनांमध्ये कमालीची प्रगती झाली आणि जीवनशैलीच्या सांस्कृतिक सीमारेषा पुरत्या पुसल्या गेल्या. एकूणच जगभर सर्वच क्षेत्रांत सुरू असलेल्या वेगवान प्रगतीमुळे जग जवळ येत असताना, बदल ही प्रक्रिया अपरिहार्य असते. बदल हीच आजच्या काळाची शाश्वत गोष्ट आहे हे एकदा मान्य केले, की बदल स्वीकारण्याची मानसिकतादेखील आपोआप तयार होत असते आणि आपण कसे बदलत गेलो हे लक्षातदेखील येत नाही. सुमारे सात-आठ पिढ्यांपूर्वी, घरातील पुरुष मंडळींचा पेहराव, पंचा, पागोटे, उपरणे असा असायचा आणि महिला 'लुगडं' नेसायच्या. काळाबरोबर बदल होत गेला आणि पंचा-उपरण्याची जागा, धोतर, सदऱ्याने घेतली. कालांतराने समाजात सुधारणेचे वारे वाहू लागले. इंग्रजांच्या जीवनशैलीचा प्रभाव समाजमनावर पडू लागला, विकास होऊ लागला, पायी चालणाऱ्यांच्या घरात सायकल, मोटारसायकल, मोटारीही दिसू लागल्या. सदऱ्यावर कोट आला. वहाणांची जागा चप्पलेने घेतली, पुढे आणखी काळ बदलला, तेव्हा धोतर कोटाची जागा पँट-शर्टने घेतली आणि काही काळाने सुटाबुटांचा जमाना सुरू झाला. गळ्यात टाय आला, डोक्यावरच्या मुंडाशाची किंवा पागोट्याच्या जागी 'कॅप' आली आणि आता तर ब्लेझर्स वगैरेचा जमाना आला. हा केवळ वेषातील बदल आहे असे वरवर वाटत असले, तरी ते तितकेसे खरे नाही. वेषाबरोबर भाषा बदलत गेली आणि जीवनशैलीबरोबरच आहारशैलीदेखील बदलत गेली. भोजनाच्या पारंपरिक पद्धती बदलल्या आणि जेवणाच्या पंगतींऐवजी 'लंच' आणि 'डिनर' संस्कृतीचा पगडा वाढू लागला. न्याहारी-नाश्त्याची जागा 'ब्रेकफास्ट'ने घेतली आणि सकाळच्या पारंपरिक नाश्त्याऐवजी 'ब्रेकफास्ट'च्या संस्कृतीचे बोट धरून फास्ट फूड, 'जंक फूड'ने घराघरात प्रवेश केला. जीवनशैली आणि आहारशैलीमधील बदलाबरोबरच, संस्कृती आणि भाषाशैलीमध्येही कमालीचा बदल होत गेला. बदलाचा हा प्रवास अनेक दशकांपासून सुरू आहे आणि आज तो स्थिरावला आहे, असे आता स्पष्ट झाले आहे. कदाचित तो बदलाच्या विश्रांतीचा एखादा टप्पादेखील असेल. तो प्रवास पुढे नव्याने सुरू झाला, तर आणखी किती टप्पे पार पाडले जातील हेदेखील आताच सांगता येणार नाही. कारण बदलाच्या प्रक्रियेच्या प्रवासाने आजचा टप्पा पार करेपर्यंत या प्रवासाची कदाचित आपल्याला कल्पनादेखील आलीच नव्हती. त्यामुळेच, आहारशैली बदलली, भाषाशैली बदलली, पेहरावही बदलत गेले.

आहाराप्रमाणेच, भाषा किंवा संस्कृती यामधील बदलाची प्रक्रियादेखील अशीच संथपणे सुरू असते. आता समाजात ज्या बदलाची चिंता व्यक्त होऊ लागली आहे, ते बदल काही अचानक झालेले नाहीत. ती प्रक्रियादेखील, अचानक किंवा नकळत, नजरेआड सुरू झालेली नाही. कदाचित, त्या त्या टप्प्यावर या बदलाच्या परिणामांचे गांभीर्य जाणवले नसल्याने त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नसावे किंवा बदलाच्या प्रवाहाच्या जोरदार प्रभावामुळे त्याची पर्वा केली गेली नसावी. भाषेच्या संदर्भात असेच काहीसे झालेले दिसते. मुळात, भाषा ही कधीच अचानक मृत्युपंथाला लागत नाही किंवा अचानक नामशेष होत नाही. ती संथपणे मारली जाते. ती टिकविणे आपल्या हातात नसेल तर किमान ती मारण्याच्या कामात तरी आपला सहभाग असू नये हे त्या वेळी लक्षात येत नसावे. जेव्हा एखादी गोष्ट, परंपरा, नियम, स्वतः तयार केलेला असतो, तेव्हा त्याचे पालन, संगोपन आणि संवर्धन करण्याची मानसिकता साहजिकच असते. ज्या गोष्टी आपण तयारच केलेल्या नाहीत, त्या जपणे, त्यांचे जतन करणे किंवा नष्ट करण्यात फारसे काही वाटत नसावे. पण मुळात ही मानसिकता देखील योग्य नाही. ज्या गोष्टी आपण निर्माण केलेल्या नाहीत, त्या मारून टाकण्याचा किंवा नष्ट करण्याचाही अधिकारच आपल्याला नसतो, ही बाब लक्षातच घेतली जात नसल्याने भाषा, वेष आदी बाबी सहजपणे कालबाह्य करून टाकल्या जातात. यामुळेच जगभरातील अनेक संस्कृती नष्ट झाल्या आहेत. सुसंस्कृत राष्ट्रे म्हणून ओळखले जाणारे जे काही देश जगभरात आहेत, त्यापैकी भारत हा सुसंस्कृत देश आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. थेट कांस्यपूर्व संस्कृतीत पाळेमुळे रुजलेल्या, बहुधा जगातील एकमेव सांस्कृतिक परंपरेचा वारसा आपल्याला लाभलेला आहे, असेही सांगितले जाते. अशा अन्य अनेक संस्कृतींनी केव्हाच माना टाकल्या आहेत. अनेक संस्कृतींनी आपला प्राण गमावला आहे आणि त्यांच्या अवशेषांचे धागे एखाद्या संग्रहालयातून अवशेषांप्रमाणे शिल्लक राहिले आहेत. भारताने मात्र, पाली संस्कृती, परंपरांचा जिवंतपणा जोशपूर्ण रीतीने जपलेला आहे. आजही आपला समाज त्या परंपरांचे, रीतिरिवाजांचे आणि संस्कारांचे पालन करतो, आपल्या परंपरेचे गोडवे गाणाऱ्या कालकथांचे पारायण करतो, त्या परंपरा साजऱ्या करतो आणि हजारो वर्षांपूर्वी रचल्या गेलेल्या वेदमंत्रांचा श्रद्धेने उद्घोष करतो. कदाचित या अभिमानामुळेच, त्यावर सुरू असलेल्या बदलाच्या आक्रमणाकडे फारसे गांभीर्याने पाहिले गेले नसावे. आता त्या जपण्याची धडपड करावी लागणार याची जाणीव तीव्र झाली आहे. पण ते सोपे नाही. त्या जपायच्या असतील, तर त्यांचे पालन करणारा समाज जगविला, टिकविला पाहिजे. तो समाज टिकवला, तर जतनाची मानसिकता टिकून राहते. तो समाज म्हणजे, आपणच आहोत, हे त्यासाठी अगोदर लक्षात घेतले पाहिजे. आपण स्वतःस तसे जगविले, तर भाषा, पेहराव, संस्कृती, आहारशैली किंवा एकूणच जीवनशैलीदेखील जगविता येते. आपण आपली भाषा, जीवनशैली किंवा आहारशैली समृद्ध करत आहोत, की ती मारून टाकतो आहोत याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे, हे जंतर मंतरवरील जेन-झी नावाच्या पिढीने केलेल्या उग्र आंदोलनामुळे अधोरेखित झाले आहे. या पिढीकडे भारताचे भविष्य म्हणून पाहिले जाते. त्यांची भाषा, पेहराव आणि संस्कृती हे सारे पाहता, भारताचे भविष्य नेमके कोणत्या दिशेला चालले आहे याचा विचार करणारी एक पिढी आज कदाचित हतबुद्ध झालेली असेल. अर्थात, बदल ही एक शाश्वत प्रक्रिया आहे आणि काळासोबत ही प्रक्रिया सुरूच राहणार आहे हे एकदा



मान्य केले, की हा बदलदेखील स्वीकारावा लागेल अशी मानसिकता असलेली पिढीदेखील समाजात आहे. त्यांच्या विचाराचा अनादर करता येणार नाही. कारण जुन्याचे जतन केले नाही तर फारसे काही अडत नाही, अशी स्थिती असल्याने, आपण आपल्या अस्मिताचिन्हांची फारशी चिंतादेखील करत नाही. कुणीतरी ती करायला हवी असे मात्र अनेकांस वाटत असते. जेन झीच्या आंदोलनानंतर ज्यांना असे काही प्रकर्षाने वाटू लागले आहे, त्यांनादेखील प्रणाम करावयास हवा. पण विकासाबरोबर होणाऱ्या बदलाची खंत व्यक्त करण्याआधी, हा बदल आपण स्वतःहून बदलत्या काळाच्या प्रभावामुळे आणि जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे स्वीकारलेला आहे, हेदेखील मान्य करावयास हवे.

तरीही, या अनपेक्षितपणे आदळलेल्या बदलाच्या परिणामांचे गांभीर्य आता तरी लक्षात येणे गरजेचे आहे. बदलाची प्रक्रिया समाजाने स्वीकारली, त्यामुळेच बदलाच्या प्रक्रियेचा प्रवेश समाजात सहज साध्य झाला हे खरे आहे. पण हा बदल धक्कादायकच आहे, असे मात्र आज अनेकांस वाटत आहे. ही चिंतादेखील बेदखल करून चालणार नाही. हा बदल केवळ भाषेतील नाही. भाषेची संस्कृती तर या बदलाने गिळंकृतच करून टाकली आहे, हे दिल्लीतील आंदोलनात तरुणाईने वापरलेल्या भाषेवरून दिसून आलेच आहे. एका बाजूला भाषांच्या अभिजाततेचे जतन करण्यासाठी एक पिढी वर्षानुवर्षे प्रयत्न करत असते, सरकारी स्तरावरून अशा प्रयत्नांच्या आदर केला जातो आणि असा काही निर्णय झाला की त्याचे आनंदोत्सवही समाजात साजरे केले जातात. भाषेच्या जतनाची, भाषेच्या परंपरा उजळून टाकण्याची ही प्रक्रिया आता भविष्यात किती काळ सुरू ठेवता येईल, याची चिंता आजच करावी लागणार आहे. कारण बदलाच्या आक्रमणाने या प्रश्नाचे गांभीर्यदेखील गिळून टाकण्यास सुरुवात केली आहे. आता भाषेला मार्दवाचे भान राहिलेले नाही. भाषा हे धारदार शस्त्र आहे, हे खरे हे पण ते भावनांना अमानवीपणाने भोसकून टाकणारे रक्तरंजित शस्त्र आहे, हेदेखील आता दिसू लागले आहे. हा केवळ भाषेतील बदलाचा परिणाम नाही. भाषेसोबतच, पेहरावातील बदलाचे एक वेगळेच दृश्यदेखील त्या आंदोलनामुळे समाजासमोर आले. भारताच्या भावी पिढीच्या पेहरावाची परंपरा कोणत्या टप्प्यावर येऊन थांबली आहे, हे त्या निमित्ताने जगाने पाहिले. हा बदलदेखील स्वीकारला पाहिजे असे काहींचे मत आहे आणि तो बदलाच्या प्रभावाचा परिणाम आहे. पेहराव किंवा वेष हे सौंदर्य खुलविण्याचे आणि लज्जारक्षणाचे साधन आहे, असा पारंपरिक समज या पिढीने झुगारून दिला आहे. आता पेहरावाचे नवे पैलू जुन्या पिढीस अस्वस्थ करू लागले असले, तरी कदाचित कालांतराने हा बदल पाहणेदेखील सवयीचे होऊन जाईल. कदाचित, आज या बदलाची चिंता व्यक्त करणाऱ्या समाजातील घटकांच्या घरांपर्यंत हा बदल येऊन दाखल होईल आणि नकळत किंवा नाईलाजाने त्याचाही स्वीकार करावा लागेल.

आता या बदलाचे काही दुष्परिणाम दिसू लागल्याने, समाज उसासे टाकू लागला आहे. अर्थात, नव्या जमान्यासोबत जीवनशैलीमध्ये घडणारे काही बदल अपरिहार्य होते आणि त्याने समाजजीवनाला एक नवे वळणदेखील दिले हे अमान्य करता येणार नाही. हे बदल समोर येऊन उभे ठाकले असताना पारंपरिक आणि पठडीबाज जीवनशैलीस चिकटून राहण्याचा हट्ट शहाणपणाचा नव्हता, हेही काळासोबत सिद्ध झाले आहे. तथापि, आहारशैली, भाषाशैली यामधील बदलाचा स्वीकार करताना, जीवनशैलीची अवघी दिशा बदलून आपण पायावर धोंडा मारून घेतला, याची जाणीव आता होऊ लागली असताना, पुन्हा एकदा त्या चुकीची दुरुस्ती करण्याचा विचार बळावत लागला ही चांगली बाब म्हणावी लागेल. एखादी चूक त्याचे दुष्परिणाम दिसू लागल्यावर लक्षात येते आणि दुष्परिणामांपासून बचाव करण्यासाठी त्या चुकीची दुरुस्ती करण्याची धडपड सुरू होते. जंक फूड आणि फास्ट फूड संस्कृती हा आपल्या आहारशैलीचा भाग कधीच नव्हता. पण तो स्वीकारल्यानंतर त्याचे सर्वाधिक दुष्परिणाम पुढच्या पिढ्यांना भोगावे लागणार हे दिसू लागल्यावर खाद्यसंस्कृतीमधील बदल स्वीकारल्याचा पश्चात्ताप आता समाजात उमटू लागला आहे आणि तो बदल नाकारण्याची मानसिकतादेखील वाढत चालली आहे. नव्या 'इन्स्टंट' खाद्यसंस्कृतीमुळे आरोग्याच्या असंख्य समस्या उद्भवत असल्याचे आता स्पष्ट झाले असून, कुपोषण आणि स्थूलपणासारख्या आजारांनी एकाच वेळी बालकांच्या विश्वावर आक्रमण करण्यास सुरुवात केली आहे. त्याबरोबरच, मधुमेहासारख्या विकारांनीही या विश्वाकडे आपला मोर्चा वळविल्याची काही उदाहरणे दिसू लागल्याने, बदलाचे बोट धरून आलेली खाद्यसंस्कृती नाकारली पाहिजे, याच्या जाणिवा आता जाग्या होऊ लागल्या आहेत.

एका चुकीच्या दुरुस्तीसाठी सुरू झालेल्या एका लहानशा प्रयत्नाची दखल येथे घ्यावी लागेल. हे प्रयत्न यशस्वी झाले, तर लहानशा प्रयत्नाचे ते मोठे यश ठरेल. महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाने शाळकरी मुलांच्या खाद्यसंस्कृतीला वळण लावण्याकरिता उचललेले पाऊल स्वागतार्ह ठरते. शाळांच्या परिसरात, पन्नास मीटरच्या परीघात वडापाव, समोसा, शीतपेये, किंवा चिप्स नावाचे कोणतेही पदार्थ खाण्यास व विकण्यास बंदी घालण्याचा निर्णय प्रशासनाने जारी केला आहे. शाळांच्या उपाहारगृहात हे पदार्थ बनविले जाणार नाहीत आणि त्यांची विक्रीही केली जाणार नाहीच, पण आता खाद्यपदार्थ पुरविणाऱ्या यंत्रणांना योग्यतेचे प्रमाणपत्रही मिळवावे लागणार असल्याने, 'सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र' या नव्या मोहिमेचा मोर्चा आता योग्य जागी येऊन थांबला आहे. खाजगी, अनुदानित, सरकारी आणि कोणत्याही शिक्षण मंडळाच्या कोणत्याही शाळेत आता असे पदार्थ विद्यार्थ्यांना मिळणार नाहीत. तळलेले पदार्थ, गोड पेये, चॉकलेट, आईस्क्रीमलाही शाळांच्या परिसरात प्रवेशबंदी करण्यात आली आहे. प्रत्येक मुलाच्या पोटात जाणारा अन्नाचा प्रत्येक घास सुरक्षित आणि आरोग्यदायी असलाच पाहिजे, ही या निर्णयामागील कल्पना स्वागतार्ह असली, तरी बदल स्वीकारण्याच्या जमान्यात हा बदल स्वीकारला जाईल का हे पाहणे मात्र औत्सुक्याचे ठरणार आहे. अर्थात, बदल घडविण्याचा हा नवा प्रयत्न यशस्वी झाला, तर त्याचे परिणाम समाजहिताचे ठरतील यात शंका नाहीच! ■

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### वर्षा वैभव

वर्षा....ग्रीष्मातला उष्मा नाहीसा करून दिलासा देणारा हिरवागार ऋतू! आपल्या अमृतमय जलधारांनी वसुंधरेला नवचैतन्य देणारा, रिमझिम सरींमुळे भुरळ घालणारा सदाबहार वर्षा ऋतू! पाऊस येताच तहानलेली सृष्टी मनोमन सुखावते, विविध रंगात रंगते आणि आनंदमग्न होते. ग्रीष्म ऋतूच्या शेवटी तप्त धरतीवर पडलेले वळिवाचे थेंब वर्षा ऋतूच्या आगमनाचा सांगावाच घेऊन येतात. असह्य उकाड्यानंतर गडगडणारे ढग आणि कडकडणाऱ्या विजा या आपल्या साथीदारांसहित वळिवाचा पाऊस अवतरतो. वेडावाकडा, तिरपा धो-धो कोसळतो अन् एका झटक्यात ढग रिकामे होऊन पुन्हा आकाश स्वच्छ होतं. पण हळूहळू पाण्याने ओथंबलेलं आभाळ दाटून येऊ लागतं. काळ्या-निळ्या ढगांच्या गर्दीने अंधारलेल्या वातावरणात पुन्हा वर्षाधारा बरसू लागतात. मृगाच्या सरींमुळे सृष्टी न्हाऊन निघते. वृक्षवेली ओल्याचिंब होतात; नद्या-तलाव जलसंपन्न होतात; डोंगरदऱ्यांत हसरी हिरवाई नजरेत भरते; काळ्या मातीतून हिरवे तृणांकुर डोकावतात. पाऊस आणखी वेगवेगळ्या रूपात आपल्यासमोर येतो, जणू काही आपली स्वभाववैशिष्ट्ये तो वर्णन करीत असतो. ज्येष्ठातला एकाएकी येणारा पाऊस मनसोक्त कोसळतो. अनाहूत पाहुण्यासारखा थोड्या वेळात निरोपही घेतो. आषाढ महिन्यात वादळी वारं, मेघगर्जना, विजांच्या नृत्यासहित जलधारा बरसतात. ही संततधार शेतकऱ्यांना पेरणीसाठी आश्वस्त करते. आषाढ पाऊस नेहमीच जबाबदार आणि कर्तव्यदक्ष भासतो. श्रावणसरींच्या रूपात पावसाची हसरी नाचरी पावलं जमिनीवर उमटतात. सोनेरी उन्हात चंदेरी सरी ताल धरतात, नाचून जातात. असा हा ऊनपावसाचा लपंडाव सुरू असतांनाच निरभ्र आकाशात इंद्रधनूची सप्तरंगी कमान अलगद अवतरते व डोळ्यांचं पारणं फेडते. भाद्रपदातल्या पावसाची तऱ्हा आगळीच असते. तो मधूनच जोरदार बरसतो व फिरून काही वेळातच विश्वामित्राचं ऊनही तापतं. फळाफुलांनी बहरून टाकणारा हा पाऊस उदार मनाचा असतो. कधी कधी पाऊस हट्टी होतो अन् कुठे अनावृष्टी तर कुठे अतिवृष्टी असं आपलं रुसलेलं, रागावलेलं रूपंही दाखवतो.

पावसाचा सुरुवातीचा जोर ओसरताच वातावरणात सर्वत्र प्रसन्नता जाणवू लागते. कोवळी पालवी जोमाने वाढीस लागते. झाडांची पाने आकाराने मोठी, हिरवीगर्द होत जातात. फांद्या लांब रुंद वाढून झाडे डौलदार दिसतात. हे हिरवं लेणं मनात भरत असतं तोच त्यांच्यावर उमलणारा सुगंधी रंगबेरंगी फुलोरा लक्ष वेधून घेतो. या टपोऱ्या टवटवीत फुलांमधील रंगाचं, आकाराचं, सुवासाचं वैविध्य अत्यंत मनोरम भासतं. कमानीवर वाढलेल्या जाई-जुई, रातराणी, चमेली यांच्या वेली आता अधिकच दाट आणि भरगच्च होतात. त्यांच्या नाजूक कळ्या संध्याकाळी उमलतांनांचा तो मंद दरवळ हवेत सर्वत्र जाणवत असतो. तगरीची सतेज पाकळ्यांची फुलं; जाडसर पाकळ्यांचा दुधमोगरा, अनंत व चाफ्याची सुगंधी फुलं असं हे धवल पुष्पवैभव मनाला सुखावतं. या दिवसातील खास आकर्षण असणारा दैवी प्राजक्त वृक्ष अंगणात असणं म्हणजे अहोभाग्यच! नारंगी दांडीच्या सुकुमार शुभ्र फुलांचा झाडाखाली पडलेला सडा जमिनीवर रेखलेल्या सुरेख नक्षीसारखा दिसतो. हारगजऱ्यांमध्ये उठून दिसणारी गुलबक्षीची फुलं आपला भडक रंग, लांब देठ व सौम्य सुवासामुळे नाजूक नखरेल अशीच वाटतात. कर्दळीच्या मोठाल्या फुलांच्या सोबतीनं उमललेली जास्वंद, अबोली, सदाफुली यांची सुबकशी बहुरंगी फुलं या सर्वांमुळे परसदारी एक वेगळीच प्रसन्नता जाणवते. पाऊस मधून मधून उसंत घेतो. त्याच्या कृपेने शेतकऱ्याचे श्रमसार्थक होऊन शेतातील पिकं आनंदाने झुलत असतात. रानावनातून रानमेवा खुणावू लागतो. पाऊस मनासारखा झाल्यामुळे पृथ्वी हसते, फुलते, तृप्त होते. पावसाच्या दिलदार वृत्तीच्या, त्याच्या वैभवाच्या खाणाखुणा सर्वत्र नजरेत भरू लागतात. तलाव-नद्यांमधून वाहणारं जलवैभव, शेतात डोलणारं कृषी वैभव, वृक्षवेलींचं हिरवगार वनवैभव, रुपरंगगंधयुक्त पर्ण-पुष्पवैभव, असं सृष्टीला सर्वांगानं संपन्न करतं हे वर्षा वैभव!

**रेणुका मुजुमदार**/९४२१८०५५४७

■■■

### पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे गरजेचे

जागतिक पर्यावरण दिन असो की वनदिन, जलदिन, वन सप्ताह, जैवविविधता दिन किंवा पुण्यतिथी-जयंतीसारखे कार्यक्रम होऊन गेल्यावर दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात देशाच्या विविध भागांतून लाखो नागरिक वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, पर्यावरण संदेश देणाऱ्या रॅली, पथनाट्य, चर्चासत्रे, संवादात्मक कार्यक्रम वगैरे उपक्रम साजरे झालेले पाहायला मिळतात. हे एक सकारात्मक चित्र आहे. पर्यावरणाची स्थिती बिकट झाली आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्यासाठी काहीतरी केलं पाहिजे, याची जाणीव होत असल्याचे यातून दिसून येत आहे. अनेकदा केवळ एक इव्हेंट म्हणून काही हौशी मंडळी असे करतात, ते मात्र योग्य नाही. पर्यावरण रक्षण मनापासून व्हायला हवे. असे असले तरी केवळ दिन साजरा करण्याच्या नावाखाली असे एक दिवसीय सामने खेळून काही साध्य होणार आहे? प्रत्येक दिवस पर्यावरणासारखा साजरा करून आपण भविष्यात सशक्त पर्यावरण घडवू शकतो, पर्यावरणाचा विनाश थांबवू शकतो. पर्यावरण स्थितीचा गेल्या ३०-४० वर्षांचा आढावा घेता लक्षात येते की, मानवी अति हस्तक्षेपामुळे आपण विनाशाचा टप्प्याच्या समीप येऊन ठेपलो आहेत. कारण विनाशाच्या वाटेवर निर्देश करणारे भौतिक बदल, पृथ्वीवरची झपाट्याने संपत चाललेली जैवविविधता, तापमान वाढ, वितळत चाललेल्या हिमनद्या, बेसुमार वृक्षतोड, जंगलतोड, ग्लोबल वार्मिंगचा धोका, सतत बदलणारे ऋतुचक्र, प्रदूषण, कचऱ्याच्या समस्या, साथीचे अनेक आजार अन् वाढती लोकसंख्या हा वेग झपाट्याने वाढतो आहे. गेल्या काही वर्षांत पशु, पक्षी, जलचर, त्यांच्या जाती-प्रजाती लोप पावल्या आहेत. ज्येष्ठ शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिन्स यांनी केलेल्या विधानानुसार येत्या काही वर्षात मानवाला स्वतःच्या अस्तित्वाकरिता दुसरा ग्रह शोधावा लागणार आहे. म्हणजेच आपणच केलेल्या पर्यावरणातील अति हस्तक्षेपामुळे आपणच आपल्याला अस्तित्वाचा प्रश्न निर्माण केला. सजीवाला जगण्यासाठी अन्न, हवा, पाणी, जंगले, पशु, पक्षी, सागर, नद्या, पाऊस, ऊन व इतर अनेक गोष्टी याच ग्रहावर असून आपण हा ग्रह आपल्या बेजबाबदार कृतीने वाचवू शकणार नाही तर दुसऱ्या ग्रहावर जाऊन काय करणार आहोत? यासाठी हवा, पाणी, जंगले, वने, पक्षी, प्राणी, डोंगर, नद्या, कीटक, वेली, टेकड्या यांचे जतन व संवर्धन होणे गरजेचे असते. निसर्गाचा समतोल राखणारी हीच मोठी साखळी असते. संवर्धन करायचे असेल तर स्वतःपासून करा. जसे घरातील अनावश्यक दिवे, पंखे, गिझर, नळबंद करणे. स्वतःच्या कचऱ्याचे व्यवस्थापन स्वतःच करणे, गरज नसताना सायकल वापरणे, प्लॅस्टिक वापर कमीत कमी करणे, एसीचा वापर मर्यादित ठेवणे या अशा अनेक गोष्टींचा भाग आहे जो साधा असला तरी संवर्धनाचा भाग आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासाचा सर्वच स्तरातून अत्यंत गांभीर्याने विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. अनेक पर्यावरण अभ्यासक, एनजीओ, संस्था, संघटना, वैयक्तिक स्तरावर काम करणारे कार्यकर्ते पर्यावरण वाचविण्यासाठी तळमळीने काम करीत आहेत. त्यांचे अभिनंदन करायलाच हवे.

**लोकेश बापट** /पुणे/ ८०८७६८२३७६

■■■

### स्वरांचा ऋषितुल्य प्रवास

महाराष्ट्र राज्य शासनाने यंदाचा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांना जाहीर करून केवळ एका संगीतकाराचा गौरव केलेला नाही, तर मराठी संगीताच्या अभिजात परंपरेचा, सुरांशी प्रामाणिक राहिलेल्या तपश्चर्येचा आणि कलात्मक मूल्यांचा सन्मान केला आहे. भारतीय संगीतविश्वात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांची ओळख केवळ लोकप्रियतेने होत नाही, त्यांच्या कलेची उंची, विचारांची खोली आणि संगीताकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यांना अजरामर बनवतो. हृदयनाथ मंगेशकर हे त्यापैकीच एक. गानसम्राज्ञी लता मंगेशकर, आशा भोसले, उषा मंगेशकर आणि मीना खडीकर यांचे धाकटे बंधू ही त्यांची ओळख असली, तरी त्यांनी आपल्या स्वतंत्र प्रतिभेने संगीतविश्वात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. त्यांच्या प्रत्येक रचनेत शास्त्रीय संगीताची बैठक, साहित्याचा सखोल अभ्यास, रागदारीची जाण आणि भावविश्वाला भिडणारा आशय अनुभवायला मिळतो. त्यामुळे त्यांचे संगीत हे केवळ मनोरंजन न राहता चिंतनाचा आणि आत्मानुभूतीचा प्रवास ठरते.

मराठी भावसंगीत, भक्तिसंगीत, चित्रपटसंगीत आणि काव्यगायन या सर्व क्षेत्रांत त्यांनी आपल्या अद्वितीय शैलीची छाप उमटवली. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, कुसुमाग्रज, ग्रेस, सुरेश भट, ना. धों. महानोर, शांता शेळके, ग. दि. माडगूळकर यांसारख्या श्रेष्ठ कवींच्या शब्दांना त्यांनी अशी चाल दिली की, त्या कविता जनमानसाच्या स्मरणात कायमच्या कोरल्या गेल्या. त्यांच्या रचना गाण्यासाठी गायकाला कस लागतो, ऐकण्यासाठी श्रोत्यालाही संवेदनशील मन लागते. त्यामुळे त्यांच्या संगीताने नेहमीच दर्जाचा उच्च निकष कायम ठेवला. महाराष्ट्र राज्य शासनाचा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार त्यांच्या या देदीप्यमान, सर्जनशील आणि मूल्यनिष्ठ प्रवासाचा सन्मान आहे.

हृदयनाथ मंगेशकर यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत महत्त्वाचा गुण म्हणजे संगीताशी असलेली निष्ठा. त्यांनी कधीही लोकप्रियतेसाठी तडजोड केली नाही. एखाद्या कवितेचा अर्थ, तिचा भाव, तिची लय आणि तिच्या शब्दांमधील सूक्ष्म अर्थछटा समजून घेतल्याशिवाय ते चाल बांधत नसत.

१९३७ मध्ये जन्मलेल्या हृदयनाथ मंगेशकर यांना संगीताचा वारसा वडील पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून लाभला. बालपणापासूनच घरात संगीताचे वातावरण होते. वडिलांच्या निधनानंतर कुटुंबावर आलेल्या कठीण परिस्थितीतही संगीताची साधना थांबली नाही. त्यांनी शास्त्रीय संगीताचा गंभीर अभ्यास केला आणि त्यातून स्वतःची वेगळी शैली विकसित केली. हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीताला समाजाशी जोडण्याचे कामही सातत्याने केले. संतवाङ्मय, शिवचरित्र, स्वातंत्र्यवीर सावरकर यांची कविता, मराठी साहित्य आणि भारतीय संस्कृती यांना त्यांनी आपल्या स्वरांतून व्यापक जनमानसापर्यंत पोहोचवले. चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार हा हृदयनाथ मंगेशकर यांच्या वैयक्तिक यशाचा सन्मान असला, तरी त्यापलीकडे तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा गौरव आहे. आजच्या वेगवान, तात्कालिक लोकप्रियतेच्या काळात अभिजात संगीत, साहित्य आणि कलात्मक मूल्ये जपणाऱ्या कलाकारांचा गौरव अधिक महत्त्वाचा ठरतो. ■

**शंतनू चिंचाळकर**/९४२०७०७३६२

# जेन झीला बदनाम करण्याचा झुरळांचा डाव

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

आजच्या काळात जेव्हा आपण 'जेन झी' हा शब्द उच्चारतो, तेव्हा आपल्या डोळ्यासमोर येतो तो तंत्रज्ञानाशी खेळणारा, प्रगत विचारांचा आणि देशाच्या भविष्याची स्वप्ने पाहणारा तरुण वर्ग. या तरुण वर्गाच्या मजबूत खांद्यावर देशाचे भविष्य आहे. अनेकदा असं वाचलं आहे की जेन झीमध्ये व्यसन करण्याचं प्रमाण कमी आहे आणि ही तरुणाई भजन नाईट्समध्येही तल्लीन होत असते. पण याच तरुणाईच्या खांद्यावर बंदूक ठेवून जर कोणी देशात अराजकता माजवण्याचा प्रयत्न करत असेल, तर ही बाब केवळ दुर्दैवी नाही तर अति भयानक आहे.

झुरळं अंधारात वावरतात, घाणीत वाढतात आणि जेव्हा उजेड पडतो तेव्हा बिळात शिरतात. ही झुरळाची खरी ओळख आहे. 'द वेनस्डे' या चित्रपटात नसिरुद्दीन शहा यांच्या तोंडी दहशतवाद्यांना उद्देशून एक संवाद येतो की जर तुमच्या घरात झुरळं झाली तर तुम्ही काय करता? थोडक्यात झुरळ हे कधी भूषण होऊ शकत नाही. ते कीटक आहेत आणि त्यांवर हिट मारले जाते. पण अभिजित दीपकेने न्यायमूर्तींच्या विधानाचा चुकीचा अर्थ घेत झुरळ नावाची चळवळ उभारली. ज्या गोष्टीची शिषारी यावी त्या गोष्टीचा अभिमान निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. या झुरळवीराने जंतरमंतरवर नीट पेपरफुटीविरुद्ध तथाकथित आंदोलन केलं. या आंदोलनात हिंदू धर्माला शिव्या देण्यात आल्या, पंतप्रधान मोदींना अत्यंत गलिच्छ शिव्या देण्यात आल्या. देशाचे तुकडे करण्याची, भारताचा नेपाळ करण्याची धमकी देण्यात आली. संसद उखडून टाकण्याची धमकी आणि तशी सोय करण्यात आली. दंगली आणि अराजकता घडवण्यात आली. आणि या सर्व गोष्टी करण्यात आल्या त्या जेन झी या गोंडस नावाखाली.



दिल्ली पोलिसांनी 'फेशियल रेकग्निशन सिस्टम' (एफआरएस) च्या माध्यमातून जी माहिती समोर आणली आहे, ती वाचून कोणत्याही सुसंस्कृत माणसाच्या अंगावर काटा येईल. या आंदोलनात चक्क २८७३ गुन्हेगार सामील होते. हो, तुम्ही बरोबर वाचलंय! ज्या आंदोलनाला 'विद्यार्थी आंदोलन' किंवा 'युवा शक्तीचा आवाज' म्हटलं जात होतं, त्या गर्दीत हत्या, बलात्कार, दरोडा आणि पोक्सो अंतर्गत गुन्हे दाखल असलेले सराईत गुन्हेगार वावरत होते. नक्षलवादासाठी शिक्षा भोगून आलेले नक्षली देखील होते.

पोलिसांच्या आकडेवारीनुसार, यात १०१ खुनी, ६१ बलात्कारी आणि २८४ दरोडेखोर होते. विचार करा, ज्या ठिकाणी तरुण मुलं-मुली आपल्या मागण्यांसाठी जमली आहेत, तिथे इतक्या मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक काय करत होते? हे लोक तिथे सहज आले नव्हते, तर त्यांना तिथे आणलं गेलं होतं, असं म्हटलं तर चुकीचं ठरणार आहे का? आणि का आणलं गेलं होतं यासाठी तल्लख बुद्धीचीही गरज नाही. लहान मुलंही सांगेल की गुन्हेगार हा गुन्हे करण्यात पटाईत असतो. तसेच या आंदोलनात ज्या प्रकारची भाषा वापरली गेली, ती ऐकल्यानंतर 'जेन झी' खरोखरच इतकी असंस्कृत आहे का? असा प्रश्न सामान्य माणसाला पडलेला आहे. देशाच्या पंतप्रधानांना अत्यंत गलिच्छ भाषेत शिव्या देणं, भारताचा नेपाळ होईल अशा धमक्या देणं, सैनिक व पोलिसांची थट्टा करण, त्यांना त्रास देणं, पत्रकारांवर हल्ले करणं, ही कसली जेन झी आहे? हा कोणत्या प्रकारचा लोकशाही अधिकार आहे? ही भाषा जेन झीची नाहीच. ही भाषा त्या लेफ्ट विंगची आहे, ज्यांनी या तरुणांच्या मनात विष कालवण्याचं काम केलं. आमची पिढी देखील एकेकाळी विशीत होती. पण आमच्या पिढीने कधी मोठ्या माणसांसमोर, महिलांसमोर शिव्या दिल्या नाहीत. काही लेफ्टिस्ट थेरड्यांनी या शिव्यांना जेन झीची भाषा म्हटली आहे. मग या थेरड्यांच्या घरात हीच भाषा वापरतात का? आणि शिव्या हे नॉर्मलाईझ करणार असाल तर उद्या समोरून शिव्या द्यायला सुरुवात झाली तर काय कराल? एका गालावर माराल तर दुसरा गाल पुढे करण्याइतके सालस इथे कुणी नाही. आता झालंही तेच. ज्या लोकांनी शिव्या दिल्या, धमक्या दिल्या त्यांना सामान्य माणूसच फटके देत आहे. पोलिस या सर्वांना अद्दल घडवत आहे. पोलिसांचा ससेमिरा वाढला आहे, तंत्रज्ञानाने या गुन्हेगारांचे चेहरे उघड केले आहेत, तेव्हा हे शिवराळ तरुण आणि त्यांचे पाठीराखे माफी मागायला लागले आहेत. आमची चूक झाली, आम्ही रागाच्या भरात बोललो अशी कारणं दिली जात आहेत. पण प्रश्न असा आहे की, हे रागाच्या भरात केलेलं कृत्य होतं की कोणीतरी याचं ट्रेनिंग दिलं होतं? स्क्रिप्ट लिहिली गेली होती? दिल्ली पोलिस आता या गुन्हेगारांचा शोध घेत आहेत. पण केवळ गुन्हेगारांना पकडून चालणार नाही, तर या गुन्हेगारांना तिथे कोणी पाठवलं? त्यांना रसद कोणी पुरवली? आणि या झुरळांचा मुख्य सूत्रधार कोण आहे? याचा शोध घेणं गरजेचं आहे. ज्याप्रमाणे पेपरफुटीसाठी धर्मेंद्र प्रधान यांना जबाबदार धरलं गेलं. नैतिकता म्हणून त्यांनी राजीनामा दिला. त्याचप्रमाणे आंदोलनादरम्यान ज्या देशविघातक घटना घडल्या त्यासाठी अभिजित दीपके आणि सौरव दास यांना जबाबदार धरायला हवं. आणि या आंदोलनाप्रमाणे या हिंसक गोष्टींचीही त्यांनी जबाबदारी घेऊन त्यांना संवैधानिक पद्धतीने शिक्षा व्हायला हवी. कारण जेन झीला बदनाम करण्यात या दोघांचा मोठा हात आहे.

विचार करा, संस्कारांची होळी करून, शिवराळ भाषेचा वापर करून एका बाजूला सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला, तर दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य जनतेच्या मनात या तरुणांबद्दल तिरस्कार निर्माण केला गेला. बघा, तुमची मुलं कशी वागतात! असा संदेश समाजात पसरवून जेन झीला 'उद्धट' आणि 'देशद्रोही' ठरवण्याचा हा एक जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न होता. हे सगळं मुद्दामून का केलं गेलं? देशात अस्थिरता निर्माण करणे. हाच एकमेव उद्देश. तरी आपल्या पोलिसांनी प्रचंड संयम दाखवला. एका पाकिस्तानी एन्फ्लुएन्सरने म्हटलं की भारतीय सरकारने मुलांचे 'लाड' पुरवलेत. आमच्याकडे तुम्ही पोलिस व सैनिकांशी मस्ती कराल तर तुम्हाला गोळ्या घातल्या जातील. आणि तरीही लबाड लोक म्हणतात की पोलिसांनी मुलांवर अत्याचार केले. उलट मुलं म्हणून खूप सहन केलं. पण आता या झुरळांना अद्दल घडवावीच लागणार आहे.

वाचकहो, आतापर्यंत आपल्याकडे नेपाळ, बांगलादेश व श्रीलंकेसारखी जेन झीची क्रांती घडावी अशी उघडउघड विधाने केली जात होती. पण सीजेपीच्या आंदोलनात हे प्रत्यक्ष घडताना आपण पाहिलो. आपला देश कमकुवत नाही म्हणून या झुरळांना पूर्ण संधी नाही मिळाली. पण जेन झीच का? जेव्हा तरुण वर्ग रस्त्यावर उतरतो, तेव्हा तो देशाचा आवाज असतो. पण जेव्हा त्या आवाजात गुन्हेगारांचा आवाज मिसळला जातो आणि त्यात शिवीगाळ येते, तेव्हा तो आवाज बदनाम होतो. या 'झुरळांना' माहीत होतं की, जोपर्यंत जेन झीची प्रतिमा जबाबदार नागरिक म्हणून राहील, तोपर्यंत त्यांचा अजेंडा यशस्वी होणार नाही. म्हणून त्यांनी या तरुणांना समोर केलं आणि मागे राहून गुन्हेगारांच्या माध्यमातून, लेफ्ट विंग तरुणांच्या माध्यमातून हिंसा आणि शिवीगाळ घडवून आणली. जेन झीला बदनाम करून त्यांना समाजापासून तोडणं, हा या मागचा मुख्य उद्देश होता. जर तरुण वर्ग बदनाम झाला, तर त्यांच्या मागण्यांकडे कोणीही गांभीर्याने पाहणार नाही. हा एक प्रकारचा 'सायकोलॉजिकल वॉरफेअर' होता, जो या देशातील काही शक्तींनी आपल्याच तरुणांविरुद्ध पुकारला होता. देशातील तरुणाईची ऊर्जा अशा विध्वंसक कामासाठी खर्च होत राहिली तर देशाची प्रगती खुंटेल, अराजकता माजेल आणि पुन्हा देश गुलाम होईल. म्हणूनच आता राष्ट्रभक्त जेन झीने पुढाकार घ्यायला हवा. मुलांनो, या झुरळांना ओळखायला शिका. हे लोक तुम्हाला क्रांतीची स्वप्नं दाखवतील, पण प्रत्यक्षात तुम्हाला गुन्हेगारीच्या चक्रव्यूहात ढकलतील. तुमची बदनामी हीच त्यांची ताकद आहे. त्यामुळे सावध राहा, अभ्यासे प्रकट व्हा आणि आपल्या हक्कासाठी लढताना संस्कारांची आणि कायद्याची चौकट मोडू नका. ■

writerjayeshmestry@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## तुम्हाला माहिती आहे का?

जगातील कोणतेही ज्ञान मराठी माणसांपासून दूर राहू नये यासाठी विश्वकोश तयार करण्यात आला आहे. आतापर्यंत विश्वकोशाचे २३ खंड प्रकाशित झाले आहेत. वर्तमानात तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे मराठी विश्वकोश व्यापक व अद्ययावत होत आहे. विश्वकोशातील नोंदीत अतिशय व्यापक व कमीतकमी शब्दात माहिती मांडली जाते. मराठी विश्वकोशाचा पहिला खंड १९७६ साली तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली प्रसिद्ध झाला होता. याशिवाय विश्वकोशातील भौतिकविज्ञान व तंत्रज्ञान या कोशाचेही काम सुरू आहे. ९वी ते १२वीचे विद्यार्थी डोळ्यासमोर ठेवून कुमार विश्वकोशाचा पहिला खंड पूर्ण झाला आहे.

## गुलदस्ता

# बहारदार पारिजात

**निशिकांत मायी / ९८८११५२४३९**

रात्रीच्या वेळेस फुलणारे, बहरणारे अन्? सकाळच्या सुमारास अक्षरश: फुलांचा सडा पडल्यागत जमिनीवर विखुरणारे मोहक असे पारिजात अर्थात प्राजक्ताचे फूल! हिंदीत ते हरसिंगार नावानेही प्रचलित आहे. काही ठिकाणी या फुलाला शेफालिका असेही म्हणतात. अत्यंत मनमोहक असा सुगंध आसमंतात पसरवणारे, भारतात उगवणारे हे एक औषधी झाड आहे. नाजूक नारंगी देठ आणि पांढ्या पाकळ्यांचे नैसर्गिकरीत्या उगवणारे प्राजक्ताचे वृक्ष उपवनात तसेच घरच्या बागेतही हौसेने लावले जाते. पाच ते सात मीटर उंच असलेल्या फांद्या चौकोनी आणि पानं खरखरीत असतात. यांचे वैशिष्ट्य असे की या पानावर टोकाकडून देठाकडे बोट फिरविले असता त्यावर काटे असल्याचा आपल्याला भास होतो. हाडांच्या दुखण्यावर या पारिजातकाच्या पानांचा वापर केला जात असल्याचा उल्लेख आढळतो. विविध दुखण्यांवर हे प्रभावशाली आहे. या पारिजातकाच्या फुलझाडाबाबत एक आख्यायिका



प्रचलित आहे. पारिजात हे रत्न असून समुद्र मंथनातून त्याची निर्मिती झाली आहे. इंद्र देवाने ते स्वर्गलोकात जाऊन लावले.? नंतर, भगवान श्रीकृष्णाने पारिजातकाचे हे झाड स्वर्गातून पृथ्वीवर आणले. झाड कुठे लावावे यावरून सत्यभामा आणि रुक्मिणी यांच्यात वाद झाला. मग श्रीकृष्णाने क्लृप्ती लढवून ते सत्यभामेच्या अंगणी अशा ठिकाणी लावले की, फुले उमलल्यावर रुक्मिणीच्या अंगणात फुलांचा वर्षाव होईल. त्यामुळेच याला स्वर्गीय फुलाचा मान प्राप्त झाला आहे. म्हणूनच स्वर्ग लोकांत अप्सरा, उर्वशी आपले नर्तन झाल्यावर थकवा या झाडाला स्पर्श करून घालवीत. पारिजातकाच्या फुलांच्या पाकळीची मधली बाजू भगव्या रंगाची असते, हे येथे उल्लेखनीय! प्राजक्ताच्या फुलांना साधारण चार ते आठ पाकळ्या असतात, ज्या टोकाकडे किंचित दुभंगलेल्या असतात. फुलांच्या मधुर सुवासाने प्रत्येक जण हरखून जातो. याचा बहर जुलै ते डिसेंबरपर्यंत असतो. इतर वेळी तुरळक फुले झाडांवर बघायला मिळतात. विद्येची देवता श्री गणेशाचे हे आवडते फूल असून श्रीकृष्णालाही तितकेच आवडते. लक्ष्मी पूजनातही या फुलांना विशेष स्थान आहे. त्याची फुले आयुर्वेदातही महत्त्वपूर्ण ठरली आहेत. याच्या फुलांपासून खाण्याचा पिवळा-केशरी रंग तयार केला जातो तसेच, विविध प्रकारची अत्तरे आणि सौंदर्य प्रसाधने तयार केली जातात. पारिजातकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सूर्यास्तानंतर या फुलांचा बहर वाढत जाऊन रात्रीच्या सुमारास तो अधिक दाट होतो. अगदी पहाटे फुलांची गळती सुरू होऊन सूर्योदयाच्या पूर्वी जवळपास सगळी फुले गळून पडलेली दिसतात. देशभरात सर्वच ठिकाणी प्राजक्ताच्या फुलांचा देवपूजेत आवर्जून समावेश होतो. पारिजातकाची पाने कोमट करून बारीक करून ती पेस्ट सांधेदुखीवर लावल्याने खूप फायदा होतो.

## Math puzzle

**Guess the number.**

I am three digit number.

First digit is double of second digit.

Second digit is square root of third digit.

Third digit is addition of first and second digit.

Previous Word Puzzle Answer : * Teeth * Merit * East * Emaile * Heat * Tear

**–: मागील अंकातील शब्दचक्र पंचाक्षरीचे उत्तर :–**
1. जनानखाना 2. जवाबदारी 3. जलसमाधी 4. जलतरण 5. जकातनाका 6. जमिनदोस्त 7. जलतरंग 8. जनमेजय

## प्रसिद्ध म्हणीच्या शोधात गुप्तहेर !

आमचे एक साहित्यिक मित्र आपल्या पुढील लेखनसाहित्यात वापरण्यास दोन महत्वपूर्ण प्रसिद्ध म्हणी (वाक्प्रचार) सोबत घेऊन चालले होते पण त्यांना ठेच लागली आणि या दोन्ही म्हणींतील अक्षरे विखरून गेलीत. त्यांना योग्य क्रमात जोडणे फार कठीण काम होते, यासाठी त्यांनी एका गुप्तहेराला ही अक्षरे योग्य क्रमात जोडण्याचे कार्य सोपविले.

तुम्ही सुद्धा ही दोन प्रसिद्ध म्हणी शोधू शकता.




## देशोदेशीच्या लोककथा

**प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२**

भाग - ३४

# सिंदबादची दुसरी सफर



माझ्या मित्र मैत्रिणींनो, तुम्हाला सिंदबादची पहिली सफर आठवत असेलच. इराकमधला बगदादचा सिंदबाद सेलर म्हणजे नावाडी, त्याची समुद्रातली सफर, देवमाशाच्या पाठीवरचं जंगल, सगळंच अद्भुत! पहिल्या सफरीत, दयाळू राजानं सिंदबादला भरपूर सोन्याच्या नाण्यांच्या थैल्या दिल्या होत्या. सिंदबादनं बगदादला, भली मोठी आलिशान हवेली बांधली. आपल्या बायको मुलांसह तो राजेशाही थाटात तिथे राहू लागला.

पण थोड्याच दिवसात परत त्याला समुद्रातून, वेगवेगळ्या बंदरांतून फिरून व्यापार करण्याचा मोह झाला. त्याच्या अब्बूचे मित्र कबीर, बगदाद मधली श्रीमंत आसामी होती. सिंदबाद त्यांच्याकडे गेला.'चाचाजान, कसे आहात? व्यापार कसा चालला आहे? आपण बऱ्याच वर्षांनी भेटत आहोत. माझ्या अब्बूजानला जाऊनसुद्धा खूप वर्षे झाली,' तो म्हणाला.'हो रे... खरंच आपल्याला भेटून खूप वर्षे झाली. तू आता परत समुद्रातून, बंदरांवर व्यापारासाठी निघणार आहेस का? मी तुला व्यापारासाठी, माझा माल दिला असता, पण मी माझा सर्व माल वेगळ्याच कोणाला दिला आहे. तो बगदादचा नाही आहे. बरं, ते जाऊ दे! मी जरा घाईत आहे. लौकरच पुन्हा भेटू.'कबीर चाचा घाईघाईनं निघून गेले.

सिंदबादला त्यांच्या बोलण्याचं, घाईघाईनं जाण्याचं खूप आश्चर्य वाटलं. काहीतरी गूढ असल्याचा संशय आला. मात्र इतर व्यापाऱ्यांकडून, त्यांचा माल घेऊन सिंदबाद परत समुद्रफिरतीवर निघाला. यावेळेचं जहाज मोठं होतं. ऐसपैस होतं. सिंदबाद मुळातच बोलघेवडा असल्याने, जहाजावरच्या प्रत्येकाशी त्याची मैत्री झाली. बरेच दिवस प्रवास केल्यावर त्यांना एक बेट दिसलं. खलाशानं, त्या बेटाच्या किनाऱ्यावर जहाजाचा नांगर टाकला. सारे त्या बेटावर उतरले.

'अहाहा, काय सुंदर, निसर्गरम्य, नयनरम्य बेट आहे हे! सारं सृष्टीसौंदर्य, डोळ्यांत साठवून घ्यावंसं वाटतंय. थोडावेळ या झाडाखाली आडवं व्हावं. अंग खूप मोडून गेलंय,' विचारांच्या तंद्रीत सिंदबाद एका भल्या मोठ्या वृक्षाच्या सावलीत पाय पसरून गाढ झोपला. जाग आली तेव्हा, त्याच्या लक्षात आलं, त्याच्या आसपास कोणीच दिसत नाही. धावतच तो किनाऱ्यावर पोहचला. त्याचं जहाज, त्याचा मित्र परिवार निघून गेला होता.

'असे कसे गेले सगळे मला सोडून? मी झोपलो होतो म्हणून काय झालं? मला उठवलं का नाही कोणी? हे कसले मित्र? मला संकटात टाकून खुशाल निघून गेले? सिंदबाद निराश झाला. काय करावं, त्याला कळेना. नारळाच्या झाडावर चढून तो एका उंच फांदीवर बसला. समोर अथांग पसरलेल्या समुद्रात एखादं जहाज दिसतंय का, ते त्याला बघायचं होतं. बराच वेळ तो तसाच झाडाच्या फांदीवर चढून बसला. इतका वेळ वाट पाहूनही एकही जहाज त्याच्या दृष्टीला पडलं नाही. शेवटी त्यानं खाली उतरायचं ठरवलं. उतरता उतरता, त्याला संगमरवरी दगडासारखं काहीतरी दिसलं.

'अरेच्चा, इथे संगमरवरी भला मोठा दगड कसा?' खाली उतरल्यावर सिंदबाद धावतच त्या दगडाजवळ गेला. त्यानं त्या दगडावरून हात फिरवला. त्याला तो खूपच गुळगुळीत लागला. अचानक तो उभा होता तिथे अंधारून आलं.

'यावेळी अंधार? आत्ता तर चांगली टळटळीत दुपार आहे. रात्र तर नाहीये... ही तर प्रचंड मोठ्या पक्षाची सावली आहे. ही सावली, हळूहळू खाली येत आहे. म्हणजे, म्हणजे...हा मोठा दगड म्हणजे या पक्ष्याचं अंड आहे तर! अरे... हा पक्षी परत उडायचा प्रयत्न करतोय. आपण आपल्याला याच्या पंजाला बांधून घेऊ. आता हाच आपल्याला इथून, दुसरीकडे घेऊन जाईल.'

सिंदबादनं झाडाच्या पारंब्यांनी, स्वतःला पक्ष्याच्या पंजाला बांधून घेतलं, पक्षी उंच आकाशात उडाला, सिंदबादही त्या पक्ष्याबरोबर,

> सिंदबादनं आपल्या खिशातून आणलेले हिरे, माणकं आपल्या ओंजळीत धरली.'बापरे, इतकी मौल्यवान रत्नं, मी पहिल्यांदाच पहात आहे,' चाचाजान म्हणाले. 'तुम्ही माझा जीव वाचवलात, म्हणून तुम्हाला हवी तेवढी रत्नं वेचून घ्या,' सिंदबाद म्हणाला.'सिंदबाद, तू खूप चांगला मुलगा आहेस. मी तुझा जीव वाचवला, यात तुझ्यावर फार उपकार नाही केले. माणुसकीच्या नात्यातून, ते माझं कर्तव्य होतं. तुझ्याकडेच ठेव, तुझा अनमोल ठेवा. मी त्यातलं फक्त एक काढून घेतो,' चाचाजानने त्यातलं एक रत्न काढून घेतलं.

उंच उडाला.

'अरे पक्ष्या थांब आता! खाली उतर आणि मलाही उतरू दे. माझी तब्येत खूप बिघडल्यासारखी वाटते आहे. आता तू जास्त वेळ उडशील तर मी बेशुद्ध पडेन. पक्षी खाली उतरायला लागली वाटतं. मी आता स्वतःला, तिच्या पंजापासून सोडवून घेतो... हे अस्सं! जमिनीवर उडी मारतो. हे काय? मी जमिनीच्या ऐवजी कुठल्या तरी भुयारात पडलो वाटतं. मी अजून खोल खोल चाललोय,' सिंदबाद स्वतःशीच बडबडत होता. त्याने उडी मारली, ती नेमकी सापाच्या वारूळात, मोठ्या भुयारात! तिथे महाभयंकर, भला मोठा साप होता. वारूळात पूर्ण अंधार होता. मात्र, त्या मोठ्या सापाचे डोळे मात्र लाल गुंजांसारखे चमकत होते.'ए खुदा...माझ्यावर रहम कर. का मला तू एका संकटातून बाहेर काढून, दुसऱ्या संकटात ढकलतो आहेस? मी असं कुठलं पाप केलं आहे की, त्याची मला शिक्षा मिळते आहे? माझ्या हातून, चुकून एखादं पाप झालं असेल तर मला माफ कर, माफ कर!' सिंदबादनं डोळे मिटून म्हटलं.

आश्चर्य म्हणजे, तो साप गपचूप तिथून निघून गेला. त्या पक्षिणीच्या सावलीला तो घाबरला. सिंदबाद जिथे पडला होता, ते मोठं भुयार होतं. अचानक त्याला मांसाचा वास येऊ लागला. वासाच्या दिशेनं तो चाचपडत निघाला. तिथे मांसाचा मोठा तुकडा होता. मघाच्या पक्षिणीची सावली त्याला दिसली. त्यानं मांसाच्या समोरचा दगड बाजूला ढकलला. ज्यामुळे पक्षिणीला मांसाचा तुकडा स्पष्टपणे दिसेल.

तितक्यात त्याची नजर, तिथल्या जमिनीवर पडलेल्या हिरमाणकांवार गेली. अनेक बहुमूल्य हिरे, माणकं, पाचू, रत्नं तिथे विखुरली होती. सिंदबादने खिशात मावतील, एवढे हिरे-माणकं त्याने उचलून घेतली. पक्षीण तिथे आली आणि मांसाचा तुकडा तिनं आपल्या पंजात पकडला. ती उडणार इतक्यात सिंदबादनं मांसाच्या तुकड्याला पकडलं. तिने उडण्याचा पवित्रा घेतला.

'ज्या घरट्यात, तिनं आपलं भलं मोठं अंडं उबवण्यासाठी ठेवलं आहे, त्याच घरट्यात तिची इतर पिल्लंसुद्धा असतील. त्यामुळे मांसाला आपण पकडून ठेवलं तर आपण नक्कीच बंदरावर पोहचू.'

सिंदबादने मांसाच्या तुकड्याला घट्ट पकडलं. पक्षीण आकाशात उंच उडाली. पर्वत, दऱ्या, समुद्र असं पार करत अखेर ती त्या बंदराच्या वर आली. मांसाचा तुकडा गुळगुळीत असल्यामुळे सिंदबादचे दोन्ही हात निसटले. तो वरून खाली पडणार इतक्यात, कोणीतरी त्याला आपल्या हातात झेललं. 'मेलो मेलो, ओय ओय' सिंदबाद जिवाच्या आकांताने ओरडत होता. कोणीतरी झेलल्यामुळे, तो थोडक्यात वाचला. सिंदबादनं त्या व्यक्तीकडे पाहिलं. ते बगदादचे कबीर चाचा होते. त्याला आश्चर्याचा धक्काच बसला.'चाचाजान, तुम्ही इथे कसे आलात आणि काय शोधत आहात?' त्यानं विचारलं. 'अरे बाबा, मी इथे बरेचदा येतो,' चाचाजान म्हणाले.

आपल्या शेरवानीच्या खिशातून मोठा हिरा काढून त्यांनी सिंदबादला दाखवला.

'यासाठी येतो. हा मौल्यवान हिरा विकून मी पुढची दहा वर्षे श्रीमंत माणूस म्हणून मिरवेन!' कबीर चाचा म्हणाले.'तुला माहित आहे, ही पक्षीण आपल्या पिलांसाठी मांसाचा तुकडा घेऊन येते नं, त्या मांसाला एक दोन हिरेमाणकं चिकटले असतात. ते मी काढून घेतो. बगदादला गेल्यावर विकतो. त्यातून मला रग्गड पैसा मिळतो. म्हणून श्रीमंत व्यापारी अशी माझी ख्याती आहे,' कबीर चाचा पुढे म्हणाले. सिंदबादनं आपल्या खिशातून आणलेले हिरे, माणकं आपल्या ओंजळीत धरली.'बापरे, इतकी मौल्यवान रत्नं, मी पहिल्यांदाच पहात आहे,' चाचाजान म्हणाले. 'तुम्ही माझा जीव वाचवलात, म्हणून तुम्हाला हवी तेवढी रत्नं वेचून घ्या,' सिंदबाद म्हणाला.'सिंदबाद, तू खूप चांगला मुलगा आहेस. मी तुझा जीव वाचवला, यात तुझ्यावर फार उपकार नाही केले. माणुसकीच्या नात्यातून, ते माझं कर्तव्य होतं. तुझ्याकडेच ठेव, तुझा अनमोल ठेवा. मी त्यातलं फक्त एक काढून घेतो,' चाचाजानने त्यातलं एक रत्न काढून घेतलं. 'चल आता, माझ्या जहाजातून बगदादला, आपल्या गावाला परत जाऊ या. जहाजावर गेल्यावर, तू इथे कसा पोहचलास हे सर्व मला सांग,' चाचाजान बरोबर सिंदबाद त्यांच्या जहाजावर पोहोचला. आपले दोन्ही हात कोपरापासून वर करून सिंदबादनं देवाचे आभार मानले.

## संघ हीच जीवनगाथा

**सुरेखा काणे/९९६०० ५३५२१**

परमपूजनीय डॉ. हेडगेवारांनी जगायचे कसे आणि कशासाठी या विषयाचा प्राणमंत्र दिला. त्यांनी आधी कृती मग, विचार मांडला म्हणून त्यांना क्रांतदर्शी म्हणतात.

आज 'द काश्मीर फाइल्स', 'पावनखिंड','धुरंधर' इत्यादी चित्रपट प्रदर्शित होऊ शकले कारण आजचे पंतप्रधान संघ विचारांचे आहेत. यातील एक चित्रपट काश्मीरमधील हिंदूंचे क्रूर हत्याकांड दर्शवितो. तेव्हा १९९० साली संघ स्वयंसेवकांनी आहार, विहार आणि उपचार आदि कामात खूप मदत केली. असे का घडले? हे डॉक्टरांच्या विचारांतून कळते. ते नेहमी सांगायचे, आपण आपली ओळख, आपली संस्कृती, आपला इतिहास, आपला पुरुषार्थ, आपले सामर्थ्य विसरलो आहोत. किंबहुना, सामर्थ्य आठवले तरी ते गुंडाळून ठेवले आहे. दुबळे बनणे आपण पसंत केले आहे. आपला हिंदू समाज रोगी बनला आहे. डॉक्टरांच्या जीवनकाळात पण हिंदू रोगी होता व आजही आहे. हे दुबळेपण घालवण्याचा प्रयत्न करू या. घटनेच्या ज्या कलमामुळे फुटीरतावादी विचार बळावले होते ते ३७० कलमही रद्द झाले आहे. एक देश-एक निशान-एक प्रधान ही घोषणा प्रत्यक्षात आली आहे. आपण एक आहोत. राष्ट्र आणि समाज हे वेगळे नाहीत तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हा भाव म्हणजे डॉ. हेडगेवार यांचा प्राणमंत्र होता. आक्रमक पवित्रे घेणाऱ्या परधर्मीयांच्या शक्तीपुढे सदैव भीतीग्रस्त राहणाऱ्या असंघटित हिंदूंमध्ये स्वसंरक्षणाचे सामर्थ्य निर्माण करण्याची आवश्यकता डॉक्टरांना वाटू लागली होतीच. त्यासाठीच संघात वैचारिक व शारीरिक शक्ती या दोन्ही शक्तींची उपासना होते.

आपल्या भारत मातेच्या स्वातंत्र्याच्या अमृत




महोत्सवानिमित्त आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून पाच प्रण सांगितले.

१. विकसित भारतासाठी कटिबद्ध व्हा.

२. गुलामी मनोवृत्तीच्या जोखडातून मुक्त व्हा.

३. आपल्या विरासतीवर गर्व करा. ती चिरपुरातन आणि नित्य नूतन आहे.

४. एक भारत श्रेष्ठ भारत करण्याची प्रतिज्ञा करा. त्यासाठी एकता अंगी बाणवा.

५. नागरिकांचे कर्तव्य, हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे ध्यानी धरा.

सर्व भारतीयांनी या पाच प्राणशक्तीचा उपयोग करावा, अशी त्यांनी आग्रहाची विनंती केली. हे संकल्प ऐकताना मनोमन असे वाटले की, हेच संकल्प घेऊन डॉक्टरजी स्वतः मार्गस्थ होत होते व मार्गदर्शन करत होते. विक्राळ प्रश्न व त्याची सोडवणूक यावरच डॉक्टरजी अखंड मंथन करत असत. आज पंतप्रधान मोदी डॉक्टरजींच्या रूपात बोलतात. या दोघांची हालचाल पाहिली की, समर्थ रामदासांचा अभंग आठवतो.

**भाग्यवंत नर यत्नासी तत्पर।**
**अखंड विचार चाळणेचा।**
**चाळणेचा यत्न यत्नाची चाळणा।**
**अखंड शहाणा तोचि एक॥**

# घट मांडताना...



देवघरात आंब्याची पाने, कुंकू आणि नारळ ठेवून तांदूळ जमवून खोलगट भागात घट ठेवला जातो. त्यावर स्वस्तिक आणि ॐ अशी मंगल चिन्हे अंकित असतात. घट हे नवसर्जनाचे, उत्पत्तीचे, जलाचे आणि योनीचे प्रतिक आहे. यातील काही प्रतिकांचा आपण इथे विचार करू या.
आश्वलायनगृह्यसूत्रात(४.५.२) घटाच्या आकाराच्या पण पुरुष-स्त्री खुणांनी युक्त असलेल्या मातीच्या भांड्यात मृताच्या अस्थी पुरण्याचा उल्लेख येतो. याचा उपोद्बलक पुरावा ताम्रपाषाण युगीन स्थळ असणाऱ्या इनामगावच्या उत्खननात मिळतो.

**पृथ्वीराज धवड/९१३०८३९७८०**

एका लहान मुलाचे अस्थिकुंभात दफन केलेले इनामगाव इथे आढळून आले आहे. लहान मुलांना दोन कुंभात घालून पुरले जाई. दोन्ही कुंभ एकाला एक तोंड लावून ठेवत. त्यापैकी एक लहान आणि दुसरा मोठा असे. लहान कुंभात डोके आणि मोठ्यात शरीर ठेवत. डोके उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे पाय करून दफन करत. मुलाचे शव कुशीवर, पाय पोटाशी दुमडून, गर्भावस्थेत असल्याप्रमाणे ठेवीत. तो जीव पुन्हा मातेच्या उदरात गेला, अशी त्यामागे भावना असावी. त्याचा पुनर्जन्म व्हावा अशी श्रद्धा असावी, असे मत डॉ. म.के.ढवळीकरांचे आहे. यासंबधीची एक वाराणसीत ऐकलेली लोककथा डॉ.सदाशिव डांगे यांनी आपल्या घट आणि हिरण्यगर्भ या लेखात दिली आहे. ही लोककथा सीतेच्या जन्मासंबधीची आहे. 'रावणाने ऋषींना मारले आणि त्यांच्या रक्ताने एक घडा भरून ठेवला. रावणाची दहशत इतकी की, त्याच्या आवाजाने स्त्रियांचे गर्भ गळून पडत. एकदा मंदोदरी आणि रावणाची बहीण गप्पा मारीत होत्या. मंदोदरी म्हणाली की, रावण अलिकडे हसत नाही, बोलत नाही.' त्यावर रावणाची बहीण म्हणाली,'बरं मी प्रयत्न करते.' त्यावर तिने रावण आल्यावर काही तरी गमतीची गोष्ट सांगितली आणि रावण जोराने हसला. तो इतका जोराने हसला की, त्या रक्ताने भरलेल्या घड्यातून एक कन्या जन्मून बाहेर आली. तीच सीता!' येथे घट गर्भस्थानाचे स्पष्ट प्रतीक आहे.

ऋग्वेदात कुंभ, पूर्ण कलश, भद्रा कलश असे उल्लेख आहेत. याशिवाय, द्रोण, कलश पात्र, सोमधान, चमस आणि कोश असे पर्यायवाची शब्द ऋग्वेदात आढळतात, असे काही विद्वानांचे मत आहे. अथर्ववेदाच्या एका मंत्रात स्त्रियांना यज्ञाच्या रक्षणार्थ पूर्ण कुंभ आणण्याचा आदेश दिला आहे. स्कंदपुराणात विवाह प्रसंगी उपयोगी चिन्हाची यादी दिली आहे त्यात पूर्ण कलशाचा उल्लेख येतो.

**घट हे समुद्र म्हणजेच जलाचेही प्रतिक मानले जाते. ग्रहण लागायच्या आधी घरात चार जलपूर्ण घट ठेवावे. त्याचे कारण म्हणजे ते चार समुद्रांचे प्रतिक आहे. नवरात्रात पहिल्या दिवशी घटस्थापना होते. घटासमोर अष्टौप्रहर दिवा जळत असावा, असे नियम असतात. घट हा देवीच्या मातृत्वाचे आणि सर्जनशिलतेचे प्रतिक आहे.**

तसेच, पूर्ण कलश हे लक्ष्मीचे प्रतिकसुद्धा आहे. भरहुत येथील शुंगकालीन स्तुपात पूर्ण कलशाचे अंकन आहे. या कलशाचे पुष्प आणि पानांनी अंकन केलेले आहे. महत्वाचे म्हणजे भरहुत इथून मिळालेल्या तीन शिला फलक असे आहेत ज्यात पूर्ण कलशातून पुष्पावर लक्ष्मी स्थित आहे. बौध्द धर्मातील कुबेरा सारखाच असणारा जम्भल हा आपल्या हातात फळ आणि मुंगुस घेऊन असतो. जम्भल बसलेला असताना त्याच्या पायाशी लवंडलेला कुंभ असतो, त्यामधून धनराशी बाहेर पडताना दिसतात. त्यामुळे कुंभ/कलश हे धनाचे प्रतिक असलेले दिसते .

नागार्जुनकोंडा येथे चुन्याच्या दगडापासून निर्मित कलश प्राप्त झाला आहे. पल्लवयुगीन कलेत पूर्ण कलशाचे अंकन मंदिराच्या शीर्षस्थानी झाले आहे. चालुक्य काळातील मंदिरात पूर्ण कलश हे मंदिराच्या द्वारावर अंकित असलेले दिसतात. बौद्ध आणि जैन धर्मातसुद्धा अष्ट मंगलांचे महत्व आहे. जैनांचे तिलोयपणत्ती यात अष्ट मंगलांची यादी दिली आहे. त्यात कलशाचा समावेश आहे.

घट हे समुद्र म्हणजेच जलाचेही प्रतिक मानले जाते. ग्रहण लागायच्या आधी घरात चार जलपूर्ण घट ठेवावे. त्याचे कारण म्हणजे ते चार समुद्रांचे प्रतिक आहे. नवरात्रात पहिल्या दिवशी घटस्थापना होते. घटासमोर अष्टौप्रहर दिवा जळत असावा, असे नियम असतात. घट हा देवीच्या मातृत्वाचे आणि सर्जनशिलतेचे प्रतिक आहे. घटाचे प्रतिकात्मक महत्व असे व्यापक आहे. देवघरातील घटाचे असणारे उद्देश अशाप्रकारे समजून घेतले पाहिजे.

# योजना कोट्यवधींच्या... तरी आदिवासी गर्भवती महिलेचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २ ऑगस्ट -**

नांदेड जिल्ह्यातील अतिदुर्गम किनवट तालुक्यातील लोखंडवाडी येथे घडलेली नऊ महिन्यांच्या गर्भवती आदिवासी महिलेच्या मृत्यूची घटना ही केवळ एका कुटुंबाचे दुःख नाही; ती संपूर्ण आरोग्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर उभा राहिलेला गंभीर प्रश्न आहे. शिवनी प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रातील कल्पना चंपत ढोले (वय २३) या गर्भवती महिलेला श्वास घेण्यास त्रास होत असल्याने उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, इस्लापूर येथे आणण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेने किनवटसह संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.



आज प्रश्न केवळ एका मृत्यूचा नाही; प्रश्न आहे त्या व्यवस्थेचा, जी प्रत्येक गर्भवती मातेच्या सुरक्षिततेची हमी देण्याचा दावा करते. राज्य आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून गर्भवती मातांसाठी विविध योजना राबविल्या जातात. नियमित तपासणी, सकस आहार, लसीकरण, मोफत उपचार, रुग्णवाहिका सेवा आणि सुरक्षित प्रसूतीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. प्रत्येक गर्भवती महिलेची नोंद आशा सेविका, एएनएम आणि आरोग्य विभागाकडे असते. मग एवढी मोठी यंत्रणा अस्तित्वात असताना एका आदिवासी मातेचा जीव का वाचू शकला नाही?

लोखंडवाडी हे गाव शिवनी आरोग्य उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रात येते. या महिलेची नियमित तपासणी झाली होती का? तिची गर्भधारणा धोकादायक असल्याची नोंद होती का? प्रकृती खालावल्याची माहिती आरोग्य कर्मचाऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचली होती का? गरज भासल्यास उच्चस्तरीय रुग्णालयात रेफर करण्याची प्रक्रिया का झाली नाही? हे प्रश्न केवळ जनतेचे नाहीत, तर संपूर्ण प्रशासनाने स्वतःलाच विचारण्याची वेळ आली आहे.

या प्रकरणी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी हे प्रकरण शिवनी आरोग्य उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रातील असल्याचे सांगत अधिक माहिती संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे असल्याचे स्पष्ट केले. परंतु अशा गंभीर घटनेनंतर जबाबदारीची स्पष्ट साखळी आणि समन्वय दिसणे अपेक्षित असताना नागरिकांच्या मनात संभ्रम निर्माण होणे स्वाभाविक आहे.

दरम्यान, इस्लापूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून शवविच्छेदनानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. त्यामुळे चौकशी पूर्ण होण्यापूर्वी कोणावरही दोषारोप करणे योग्य ठरणार नाही. मात्र, निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी होणे ही प्रशासनाची जबावदारी आहे.

दुर्गम भागात आरोग्य सुविधा कागदोपत्री नव्हे, तर प्रत्यक्षात सक्षम असणे गरजेचे आहे. केवळ इमारती उभारून, योजना जाहीर करून किंवा निधी खर्च करून आरोग्य व्यवस्था सक्षम होत नाही. वेळेवर तपासणी, प्रशिक्षित मनुष्यबळ, प्रभावी आपत्कालीन सेवा, पुरेशी औषधे, कार्यक्षम रुग्णवाहिका व्यवस्था आणि जबाबदारीची साखळी यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली तरच अशा घटना टाळता येतील.

एका आदिवासी मातेचा मृत्यू हा कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी वेदनादायी आहे. हा मृत्यू आकडेवारीत हरवून जाऊ नये. या घटनेची सखोल चौकशी होऊन सत्य जनतेसमोर आले पाहिजे. जिथे त्रुटी असतील त्या दूर झाल्या पाहिजेत, आणि जिथे निष्काळजीपणा असेल तिथे कठोर कारवाई झाली पाहिजे. कारण प्रत्येक मातेला सुरक्षित मातृत्वाचा अधिकार आहे-आणि त्या अधिकाराचे संरक्षण करणे ही केवळ आरोग्य विभागाची नव्हे, तर संपूर्ण प्रशासनाची सामूहिक जबाबदारी असल्याचे बोलले जात आहे.

**नऊ महिन्यांच्या आदिवासी गर्भवतीच्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी करा - आ. भीमराव केराम**



किनवट - किनवट तालुक्यातील लोखंडवाडी येथील नऊ महिन्यांच्या आदिवासी गर्भवती महिलेच्या मृत्यूची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार भीम राव केराम यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली आहे.

या घटनेमुळे नांदेड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, दुर्गम आदिवासी भागात गर्भवती महिलांना वेळेवर उपचार, तज्ज्ञ डॉक्टर, रुग्णवाहिका व आवश्यक सुविधा उपलब्ध होत नसल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे आरोग्य यंत्रणेवर प्रभावी नियंत्रण नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

मृत महिलेच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी तसेच किनवट-माहूरमधील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये डॉक्टर, परिचारिका, औषधसाठा, रुग्णवाहिका आणि प्रसूतीसाठी आवश्यक सुविधा कायमस्वरूपी उपलब्ध करून आरोग्य व्यवस्था सक्षम करावी, अशी मागणीही आमदार केराम यांनी केली.

# बारडमध्ये कर्णकर्कश आवाजास नागरिक वैतागले

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २ ऑगस्ट -**

बारड येथील ओम शांतीनगर परिसरात गेल्या अनेक वर्षापासून विनापरवाना सुरू असलेल्या लाकूड कटाई मशीन मुळे कर्णकर्कश्य आवाजास नागरिक वैतागले असून वस्तीत वास्तव्य करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून यासंदर्भात वन विभाग, स्थानिक प्रशासन, पोलीस प्रशासन संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार करूनही ठोस कार्यवाही केली जात नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे .

## विनापरवाना लाकूड कटाई मशीनवर कार्यवाईची मागणी

ओम शांतीनगर वस्तीत वास्तव्यात असलेले दत्ता मल्हारी लोणे यांनी यासंदर्भात वनविभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे . लाकूड कटई व्यवसायासाठी दिवसभर मशीन चा वापर केला जात असून कर्ण कर्कश्य आवाजाचा नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे . शालेय विद्यार्थ्यांना अभ्यासात अडथळे निर्माण होत असून वृद्ध, रुग्ण , आजारी व्यक्ती , महिला यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे . यापूर्वी संबंधित विभागाने वस्तीतील नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन लाकूड कटाई मशीन इतरत्र हलविण्यात आली होती . परंतु पुन्हा आता भर वस्तीत लाकूड कटई व्यवसाय जोमात सुरू आहे . विनापरवाना सुरू असलेल्या व्यवसायाची चौकशी करून कर्ण कर्कश आवाज बंद करण्याची मागणी वस्तीतील नागरिकांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे .

वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारीची दखल घेऊन विनापरवाना लाकूड कटई मशीन चालकास नोटीस बजावली आहे . परंतु याचा कुठलाही परिणाम लाकूड व्यवसायिकावर झाल्याचे दिसून येत नाही . तक्रारदारांनी यासंदर्भात पुन्हा वनविभागास विचारणा केली असता ग्रामपंचायतची परवानगी असल्याचे उत्तर देऊन मोकळे झाले आहे . ग्राम पंचायत कार्यालयास याबाबत विचारणा केली असता कुठलीही परवानगी दिली नसल्याचे सांगून मोकळे झाले आहे . लाकूड व्यवसायिक मात्र तक्रारीस जुमानत नसून वस्तीतील नागरिक मात्र कर्ण कर्कश्य आवाजाला वैतागले आहे . या वस्तीतील नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन मार्ग काढतील का याचीच आस लागली आहे .

**विनापरवाना लाकूड व्यवसाय**

ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार गावात कथितपणे विनापरवाना लाकूड व्यवसाय सुरू असतानाही संबंधित विभाग मात्र प्रभावी कारवाई करत नसल्याचा संशय व्यक्त केला आहे . पर्यावरण संवर्धन वृक्ष संवर्धन ध्वनी प्रदूषण नियंत्रणाचे नियम केवळ कागदावरच राहिले आहे का असा संतप्त सवाल ही नागरिकांनी उपस्थित केला आहे . एकीकडे शासन वृक्ष संवर्धनासाठी जनजागृती करत असून दुसरीकडे मात्र अवैध मार्गाने लाकूड व्यवसायाकडे दुर्लक्ष केले जाते ही बाब आश्चर्य जनक असल्याचेही बोलले जात आहेत .

**तक्रार देऊनही ठोस कार्यवाही नाही : दत्ता मल्हारी लोणे**

विनापरवाना सुरू असलेल्या लाकूड कटई मशीन बाबत वनविभाग ग्रामपंचायत कार्यालय पोलीस प्रशासन त्यांना वारंवार तक्रार देऊनही ठोस कार्यवाही केली जात नाही कर्ण कर्कश्य आवाजामुळे नागरिकांचे जगणे कठीण झाले असून संबंधितावर तातडीने कार्यवाही न झाल्यास ना इलाज असतो जण आंदोलन छेडण्याचा इशारा दत्ता मल्हारी लोणे यांनी दिला.

**तक्रारारीची दखल घत नोटीस बजावली : वनपाल एम. एस कवळे**

लाकूड कटई विनापरवाना मशीन बाबत तक्रार प्राप्त झाली आहे . या तक्रारीची दखल घेऊन संबंधितास नोटीस बजावण्यात आली आहे . यानंतर नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही केली जाईल अशी माहीती वनपाल एम. एस कवळे यांनी दिली.

## सहशिक्षक मारोतराव शिंदे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त




**नवीन नांदेड** -गणपतराव मोरे विद्यालय किवळा तालुका लोहा येथील गणित विषयाचे शिक्षक मारोतराव तेजरव शिंदे हे ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत .त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. हुतात्मा भगतसिंग शैक्षणिक संस्था कलंबर संचलित गणपतराव मोरे विद्यालय किवळा येथे दिनांक ११जुन १९९३ रोजी गणित विषयाचे शिक्षक म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. या ठिकाणी गणित विषयाचे तज्ञ म्हणून त्यांची ओळख होती. त्याचबरोबर किवळा ग्रामस्थांच्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी अगदी जिव्हाळ्याचे संबंध ठेवून आपल्या नोकरीचे ३३ वर्ष संस्थेच्या जडणघडण्याची जबाबदारी जोपासत दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या या सेवा निवृत्ती बद्दल संस्थेचे संचालक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ओमकेश जाधव,उत्तम जाधव धानोरकर, माधव जाधव धानोरकर धुमाळे जी.एम., संजय कदम तसेच पत्रकार संभाजी सोनकांबळे यांनी अभिनंदन करून पुढील आयुष्य निरोगी व भरभराटीचे जावो यासाठी शुभेच्छा दिल्या.


## तीस वर्षांच्या सेवेनंतर मुख्याध्यापक सुभाष सावते यांचा सेवापूर्ती सन्मान

**भोकर** -शासकीय आश्रम शाळा, मोहपूर येथील मुख्याध्यापक सुभाष उकंडराव सावते यांनी तब्बल ३० वर्षांची प्रदीर्घ शैक्षणिक सेवा पूर्ण केल्यानिमित्त त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा ३१ जुलै रोजी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोहपूरच्या सरपंच सुवर्णाताई देवीदास आमले या होत्या.या सोहळ्यास आमदार भीमराव केराम मित्र मंडळाचे तालुकाध्यक्ष पंढरीनाथ ठाकरे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष देवानंद बोथींगे, आदिवासी विकास विभाग, अमरावतीचे विभागीय अध्यक्ष आडबलवार, आदिवासी सेवक शिरडे महाराज, माजी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष किसन सरकुंडे, गणेश कदम पाटील, कुंभार सर, खिल्लारे सर, जाधव सर तसेच मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष मटमवार सर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी गावकरी, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. .कार्यक्रमात विद्यार्थिनी संस्कृती प्रभाकर जेवलेवाड, श्रावणी ढगे आणि महेश्वरी बोडके यांनी मनोगत व्यक्त करून सावते यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील वारकर सर यांनी केले.

## जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी विकास वाघमारे, सचिवपदी अनिल डोईफोडे

**भोकर** -सार्वजनिक अण्णाभाऊ साठे जयंती मंडळाच्या नूतन कार्यकारिणीची निवड लहुजी चौक येथे समाजबांधवांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत सर्वानुमते करण्यात आली. बैठकीत मंडळाच्या अध्यक्षपदी विकास दिलीपराव वाघमारे यांची, तर सचिवपदी अनिल डोईफोडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे अध्यक्ष विकास दिलीपराव वाघमारे सचिव अनिल नरसिंगराव डोईफोडे, कार्याध्यक्ष बाळासाहेब टिकेकर, उपाध्यक्ष सुभाष भालेराव, ओमश्री सखाराम वाघमारे, बालाजी काळे सहसचिव संतोष अण्णा सूर्यवंशी, आकाश भालेराव, बंटी गायकवाड कोषाध्यक्ष महेंद्र किनीकर सदस्य चंद्रकांत बाबळे, संतोष झुंझारे, बालाजी एडके, साईश्याम वाघमारे, रवी किनीकर, साईप्रसाद चंद्रभान मार्गदर्शक उत्तम बाबळे, के. व्ही. देवकांबळे, दिलीप वाघमारे, अशोक वाघमारे, अरुण डोईफोडे, शाहीर माधव वाघमारे, देवराव मनपूर्वे, राजन्ना माहूरकर, अशोक निळकंठे, पांडुरंग वाघमारे आदिंची निवड करण्यात आली.





# फटाक्यांची आतिषबाजी.. फुलांची उधळण..ढोलताशांचा गजरात आ. चिखलीकर यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छाचा वर्षाव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ ऑगस्ट -**

नेत्याच्या वाढदिवसासाठी शुभेच्छा देण्यासाठी उसळलेली गर्दी त्या नेतृत्वाच्या सामान्य जनतेतील असलेले आपुश्रकीचे स्थान आधोरेखित करते. लोहा -कंधार शहर व ग्रामीण भागात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसा निमित विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले. नांदेड ते लोहा ते कंधार ते किवळा -सिडको या मार्गावर जागोजागी फटाक्यांची अतिषबाजी ढोलताशाच्या गजरात.. फुलांची उधळण.. जागोजागी केक कापून अभिष्टचिंतन करण्यात आहे. मतदान संघातील जनसामान्यानी अतिशय हर्ष उल्हासात आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस साजरा केला,

लोहा शहरात रविवारी (२ ऑगष्ट) सकाळी साडे दहा वाजण्याच्या सुमारास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे याआगमन झाले. जवळपास पाच तास शहरात त्याचा वेगवेगळ्या ठिकाणी वाढदिवस साजरा करण्यात आला छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आनबेडकर जगतज्योति महात्मा बसवेश्वर ,पुतळा व अहिल्यादेवीं होळकर स्मरकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जागोजागी फटाक्यांची अशिषबाजी. ढोल ताशांचा गजर करत 'फुलांची उधळण करत लाडक्या नेत्यांचे म्हणजे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला

माजी आ. सुभाष साबणे, माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे , माजी आ. अविनाश घाटे, माजी आ. माधवराव जवळगावकर, माजी आ अविनाश घाटे, युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर माँ जिजाऊअर्बन बँकेच्या चेअरमन

प्रणिताताई देवरे- चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, युवानेते सचिन पाटील सोबत होते शहरात माजी नगराध्यक्ष कल्याणराव सूर्यवंशी ,मुख्याधिकारी संदीप भोळे



माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माणिकराव मुकदम, उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवर। मुकदम, माजी उपनगराध्य छत्रपती धुतमल, माजी उपनगराध्यक्ष दता वाले , माजी जि प सदस्य हंसराज पाटील ,माजी सभापती खुशाल पाटील, शिवसेना उपजिल्हा प्रमुख बाळासाहेब कऱ्हाळे, माजी जि प सदस्य गणेशराव सावळे मारोती पाटील बोरगावकर नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, भारकर पाटील , बालाजी खिल्लारे, बी डी जाधव , मारोती जंगले सदा तेलंग, , गणेश बगाडे, तुकाराम दाढेल , बालाजी कोटगिरे, सतीश निखाते, शेख सिकदर :केतन खिल्लारे, मंजलवाड, इरबा पवार बाळू पाटील गवते, भारत पाटील कदम, विजय पवार, त्र्यंबक डिकळे, दीपक पाटील, राम पाटील अविनाश पवार, राजेश बोडके, पंकज परिहार, दता शेटे से पेशी, छोटा हत्ती चालक-मालक संघटनेचे अनिल धुतमल, सुरेश दाढेल, इंजि अविनाश सूर्यवंशी, ,शंकर वट्टमवार, भूषण दमकोंडवार पत्रकारांच्या गोविंद कदम, इमाम लदाफ, रत्नाकर महाबळे, हरिहर धुतमल , माजी नगरसेवक रमेश माळी, मनोज निखाते विजय 'वाघमारे ,विनोद महाबळे विलास सावळे, बालाजी पाटील बोरगावकर यासह अनेकांनी शहरात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे, अभिव्यचिंतन केले. वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच देगलूर, मुखेड, हदगाव या भागातून मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते पदाधिकारी लोह्यात आ चिखलीकर यांचे अभिष्टचिंतन करण्यासाठी आले होते

**जगतज्योती म. बसवेश्वर पुतळ्याचे सुशोभिकरण आरंभ**

नगर परिषद प्रांगणात जगतज्योति महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याच्या सशोभिकरणाची शुभारंभ आ. प्रतापराव पाटील चिखाडिलकर यांच्या हस्ते करण्यात आला. माजी . सुभाष साबणे , माजी आ माधवराव जवळगावकर, माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे, माजी आ अविनाश घाटे, माणिकराव मुकदम प्रवीण पाटील चिखलीकर, प्रणिताताई, नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करिमशेख, केशवराव मुकदम , सचिन पाटील , हरिभाऊ चव्हाण , माजी उपनगराध्यक्ष दता वाले ,मुख्याधिकारी संदीप भोळे यासह मान्यवरांच्या हस्ते कुदळ मारण्यात आली समाज बांधवांना दिलेले आश्वासन पूर्ण करतानाच विकास कामासाठी राजकारण होऊ नये असे आ. प्रतापराव पाटील म्हणाले .याप्रसंगी मलकु आप्पा शेटे ,दता शेटे, छत्रपती स्वामी , प्रभाकर टाले , मारुती सोनवळे गंगाधर स्वामी मारुती एजगे, हरिहर शेटे, राजू शेटे, सुभाष बनसोडे यासह समाज बांधव उपस्थित होते .।त्यांनी आ चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार ,उपनगराध्यक्ष करीम शेख व सर्व टीमचे अभिनंदन केले

# जल जीवन मिशन कर्मचाऱ्यांना नियमित वेतन देण्याचे आदेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ ऑगस्ट -**

जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना नियमित वेतन देण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत, सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करावे तसेच न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत त्यांच्या जागी कोणतीही तदर्थ नियुक्ती करू नये, असे निर्देश न्यायालयाने राज्य शासनाला दिले.

जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन विभागांतर्गत कार्यरत जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या जिल्हा व तालुकास्तरीय कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २०२५ पासून नियमित वेतन मिळालेले नाही. नियमित वेतन तसेच इतर प्रलंबित मागण्यांसाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने सादर केली होती. तसेच मुंबईतील शिवाजी पार्क येथे आंदोलनही करण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही प्रश्न निकाली न निघाल्याने न्यायालयाचे दार ठोठावण्यात आले.

याप्रकरणी जिल्हा परिषद, नांदेड येथील जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन विभागातील डॉ. नंदलाल लोकडे व इतर कर्मचाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती. ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्यांच्या वतीने ड. गौतम कर्णे यांनी कर्मचाऱ्यांना अनेक महिन्यांपासून वेतन मिळत नसल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच कर्मचाऱ्यांच्या सेवासुरक्षेबाबतही न्यायालयाकडे मागणी करण्यात आली. शासनाच्या वतीने ड. ए. बी. गिरसे यांनी बाजू मांडली.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी व न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठाने, सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करण्यात यावे तसेच न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत त्यांच्या जागी कोणतीही तदर्थ नियुक्ती करू नये, असे आदेश दिले.

या प्रकरणात महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे सचिव, जल जीवन मिशन-स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक तसेच संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गेल्या आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेला वेतनाचा प्रश्न न्यायालयाच्या आदेशानंतर किती लवकर मार्गी लागतो, याकडे राज्यातील जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंतीच्या बंदोबस्तात कुंटूर पोलिसांची दमदार कारवाई

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २ ऑगस्ट -**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कुंटूर पोलिसांनी राबविलेल्या विशेष गस्तीदरम्यान अवैध देशी दारूची वाहतूक करणाऱ्या दोघांना रंगेहात अटक करण्यात आली. या कारवाईत ९६ देशी दारूच्या बाटल्या आणि एक मोटारसायकल असा एकूण ७७ हजार ६८० रुपयां चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून. पोलीसांच्या तत्पर कारवाईमुळे अवैध दारू वाहतुकीला मोठा आळा बसला आहे.



पो.नि.विशाल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल कंधारे व पोलीस कर्मचारी हंबर्डे हे १ ऑगस्ट रोजी कुंटूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नियमित गस्त घालत असताना देगाव फाट्याजवळ एमएच-२६-सीए-८९६४ क्रमांकाची काळ्या रंगाची पल्सर मोटार सायकल संशया स्पदरीत्या येताना दिसली. पोलिसांनी तत्काळ वाहनथांबवूनतपासणी केली असता मोटार सायकलवरील खाकीरंगाच्या पोत्यामध्ये 'देशी भिंगरी संत्रा' ब्रँडच्या ९६ देशी दारूच्या बाटल्या आढळून आले असता त्या जप्त करण्यात आल्या.देशी दारूची किंमत ७ हजार ६८० रुपये असून मोटारसायकलची अंदाजित किंमत ७० हजार रुपये आहे. असा एकूण ७७ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.या

प्रकरणी रामेश्वर गुणवंतराव गुडपे (वय ३०) व बालाजी गोविंदराव गुडपे (वय२८,दोघेही रा. देगाव, ता.नायगांव) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विक्रीच्या उद्देशाने अवैधरित्या देशी दारूची वाहतूक व साठा केल्याचा त्यांच्यावर आरोप असून या प्रकरणाचा पुढील तपास कुंटूर पोलीस करीत आहेत.

हअण्णाभाऊ साठे जयंतीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष बंदोबस्त आणि सतर्क गस्ती दरम्यान झालेल्या या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिसांची कारवाई या पुढेही अशीच प्रभावीपणे सुरू राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# भाजपच्या बैठकीत तिरंगा यात्रा, मतदार यादी पूनरिक्षणचा आढावा





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**
भारतीय जनता पार्टी हिंगोली जिल्हाच्या वतीने 'हर घर तिरंगा' अभियान, तिरंगा यात्रा, संत रोहिदास महार- ाज जयंती तसेच मतदार यादी पुनर्नरीक्षण या महत्त्वपूर्ण विषयांवर जिल्हास्तरीय आढावा बैठक उत्साहपूर्ण वाता- वरणात संपन्न झाली.


बैठकीत आगामी हर घर तिरंगा अभियान आणि तिरंगा यात्रा यशस्वी करण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले. प्रत्येक गाव, शहर आणि बूथ स्तरावर नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवून देशभक्तीची भावना अधिक दृढ करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी संत रोहिदास महाराज जयंती विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांद्वारे उत्साहात साजरी करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच मतदार यादी पुनर्नरीक्षण प्रक्रियेत प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट होण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, नवमतदारांची नोंदणी व आवश्यक दुरुस्त्यांवर विशेष भर द्यावा, असे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, खासदार रामराव वडकुते, आमदार तानाजी मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, आमदार प्रज्ञाताई सातव, माजी जिल्हाध्यक्ष तथा संयोजक फुलाजी शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, महिला जिल्हाध्यक्षा उज्वला ताई तांबळे, माजी नगराध्यक्ष शिवदास बोड्डेवार, खोबराजी नरवाडे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, रजनीश पुरोहित, सुनिताताई मुळे, उमेश सोमानी, नेते अतीश दांडेगावकर आदी मान्यवर बैठकीसाठी उपस्थित होते.

बैठकीत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. जिल्हाभरात पक्ष संघटना अधिक बळकट करत जनतेपर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती पोहोचविण्यासाठीही कार्यकर्त्यांना सूचना देण्यात आल्या. या बैठकीस भारतीय जनता पार्टीचे जिल्ह्यातील पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, मोर्चा पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# डायल ११२ सेवेत हिंगोली जिल्हा राज्यात अव्वल क्रमांकावर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**



पोलिस दलाच्यावतीने तातडीच्या मदतीसाठी सुरू केलेल्या डायल ११२ या आपत्कालीन प्रतिसाद प्रणालीमध्ये हिंगोली जिल्हा पोलिस दलाने जुलै महिन्यात १०२९ जणांना मदत करून राज्यात अव्वल क्रमांक मिळवला आहे.

राज्यात पोलिस दलाच्यावतीने २०२१ पासून सुरू असलेल्या डायल ११२ प्रणालीद्वारे नागरिकांना तातडीची पोलिस मदत उपलब्ध करून दिली जाते. हिंगोली जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांमध्ये ही सेवा प्रभावीपणे कार्यरत असून पोलिस नियंत्रण कक्षातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समन्वयामुळे प्रतिसादाचा वेग आणि कार्यक्षमता लक्षणीय वाढली आहे. डायल ११२ या क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर शक्य तितक्या लवकरच पोलिस कर्मचारी घटनास्थळी पोहोचून मदतकार्य करीत आहेत. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या नागरिकांना मदत मिळणे शक्य झाले आहे. राज्यात आतापर्यंत डायल ११२ वर आलेल्या हजारो कॉल्सपैकी महिलांशी संबंधित, अपघात, चोरी, हरवलेल्या व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर आपत्कालीन घटनांमध्ये पोलिसांनी तातडीने मदत पुरवली. गरजू नागरिकांना वेळेत मदत मिळाल्यामुळे अनेक प्रकरणांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून आला आहे.

दरम्यान, घटनास्थळी तातडीने पोहोचून कारवाई करण्याच्या कामगिरीत हिंगोली जिल्ह्याने जूनमहिन्यात राज्यभरात २८ वा क्रमांक मिळवला होता. मात्र त्यानंतर पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांनी प्रत्येक पोलिस ठाण्यात स्वतंत्र कक्ष सुरू करून त्याचा नियमितपणे आढावा घेण्यात सुरूवात केली होती. यामध्ये एखाद्या घटनेची पोलिस ठाण्याला कधी माहीती मिळाली, पोलिस यंत्रणा घटनास्थळी कधी पो- होचली, पोलिसांना पोहोचण्यासाठी उशिर का झाला याची माहीती घेवून जिल्हा पोलिस दल कुठे मागे पडत आहे याची माहीती देत नियोजन करून दिले. त्याचा सकारात्मक परिणाम जुलै महिन्यात झाला असून जून महिन्यापर्यंत २८ व्या क्रमांकावर असलेल्या हिंगोली जिल्ह्याने थेट राज्यात पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

हिंगोली जिल्ह्यात जुलै महिन्यात जिल्हा पोलिस दलाच्या ११२ वर १०२९ कॉल्स प्राप्त झाले. त्यापैकी ३०८ महिलांना वेळेत मदत करण्यात आली. अपघाताच्या २९ घटनांमध्ये जखमींना तातडीने उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात यश आले. तसेच चोरीचे ५४, रस्ते अपघाताचे २९, बेपत्ता झाल्याच्या ६, ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित ५२ आणि इतर ३३४ प्रकरणांमध्ये त्वरीत पोलिसांची मदत पुरवण्यात आली आहे.

# अण्णाभाऊ साठे समाजनिष्ठ व तितकेच जीवनवादी- अर्धापूरकर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य सम ाजनिष्ठ व वास्तवादाबरोबरच शाश्वत सत्याचा आणि म ाणुसकीचा पुरस्कार करणारे आहे. त्यांनी लोकभाषेतून शेतकरी, कष्टकरी, श्रमिक व उपेक्षितांचे भीषण वास्तव शब्दबद्ध करून म ोठी क्रांती घडवून आणली, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक अशोक अर्धापुरकर यांनी केले. अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती शाखा हिंगोलीच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीचा कार्यक्रम रामाकृष्णा नगर येथील हनुमान मंदिरात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक अशोक अर्धापुरकर तर प्रमुख पाहुणे म्हणून साहित्य भारतीचे प्रांत उपाध्यक्ष प्रा.डॉ.राजीव यशवंते, कवी व लेखक कलानंद जाधव, मारोतराव राऊत, कवयित्री डॉ.अंजली टापरे, प्रसिद्ध कवी प्रा.मुरलीधर जायभाये, कवी शिव- ाजीराव कऱ्हाळे उपस्थित होते. भारतीय संस्कृती, ढासळत जाणारी नीतिमूल्ये, राष्ट्रीयत्व,पर्यावरण रक्षण इत्यादीबरोबरच वैश्विक मूल्यांचे जतन आणि संवर्धनासाठी साहित्यिकांनी आपली प्रतिभा पणाला ला- वावी-हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून साहित्य भारती महाराष्ट्रातील कवी व लेखकांना प्रोत्साहित करीत आहे, असे आपल्या प्रास्ताविकातून हिंगोली जिल्हाध्यक्ष संतसाहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ.ज्ञानेश्वर गाडे यांनी यावेळी व्यक्त केले.

कवी कलानंद जाधव यांनी अण्णाभाऊ साठे यांचा एक पोवाडा व लावणी सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. प्रा.मुरलीधर जायभाये यांनी लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' या ग्रंथाच्या माध्यमातून प्रखर देशभक्तीबरोबरच समाज जागृती कशी केली हे सांगितले. संघटन मंत्री गंगाधर जाधव यांनी साहित्य भारतीचे गीत गाऊन देशभक्तीमय वातावरणात श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कवयित्री प्रा.अंजली टापरे यांनी व कवी राजकुमार मोरगे यांनी आपल्या कविता सादर केल्या.



**हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात रविवारी उबाठा शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाप्रमुख गोपू पाटील, जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, उपजिल्हा प्रमुख परमेश्वर मांडगे, विनायक भिसे, गणेश शिंदे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. छाया-विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती साजरी




हिंगोली- ॲड.कै.ग्यानबाराजी सेवाभावी संस्था द्वारा संचलित राष्ट्रम ाता जिजाऊ विद्यानिकेतन शाळेत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती या दोन्ही थोर पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती व पुण्यतिथी मोठ्या उत्साह साजरी करण्यात आली. या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनी पलक पाईकराव, काजल देवकर यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती पडघन तर प्रमुख पाहुणे श्रीमती वाबळे यांनी आपले स्थान भूषविले. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे लोकमान्य टिळक यांच्या कार्याबद्दल आपले मनोगत सादर केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ, पर्यवेक्षक कान्हेड, पाईकराव, सोळंके, टेकाळे, काळे, कान्हेड, शिंदे, शेख इमरान, नरवाडे ताई उपस्थित होते.

### पुरूषोत्तम महाले यांचा सेवापूर्ती सोहळा



हिंगोली-येथील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयातील पुरुषोत्तम महाले हेआपल्या ३१ वर्षाच्या प्रदीर्घ प्रशासकीय सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती निमित्त सेवा गौरव कार्यपूर्ती सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी रविराज बोथीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श महाविद्यालयाचे माजी एनसीसी अधिकारी मेजर पंढरीनाथ घुगे, गटनिदेशक यू बी जाधव, बाळासाहेबजी चव्हाण, सत्कारमूर्ती पुरुषोत्तम महाले व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. ज्योती महालेआणि हिंगोली जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खा- जगी द्विलक्षी व उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण विभाग हिंगोली जिल्हा, प्रमाणपत्र कोर्सेस चालणारे संस्थाचालक, व तंत्रनिकेतन विद्यालयातील हितचिंतक स्नेही, मित्र व आप्त स्वकीय उपस्थित होते. यावेळी मेजर पंढरीनाथ घुगे, बाळासाहेब चव्हाण, डॉ.विद्या रोशन चव्हाण यासह विविध मान्यवरांनी त्यांच्या सेवा कार्याचा गौरव पर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय चिंतारे प्रास्ताविक देविदास गंगावणे आभार प्रदर्शन रणजीत सावळे यांनी मानले.

# वीज ग्राहक संघटनेच्या कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**
जिल्ह्यातील वीज ग्राहकांच्या प्रलंबित अडचणी सोडवण्यासाठी आणि वीज वितरण कंपनीच्या कारभारात सुधारणा घडवून आणण्यासाठी कार्यरत असलेल्या 'वीज ग्राहक संघटने'च्या अधिकृत कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

ग्राहकांना वापरापेक्षा अधिक युनिटची मिळणारी भरमसाठ बिले, सोलर विजेचे चुकीचे समायोजन (एडजस्टमेंट), वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा या आणि अशा अनेक तीव्र समस्यांनी हिंगोलीकर त्रस्त आहेत. या सर्व अडचणी थेट वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोच- वून त्या निकाली काढण्यासाठी हे कार्यालय समन्वयकाची भूमिका बजावणार आहे.

हे कार्यालय 'जिंतूर बँकेशेजारी, अकोला रोड, हिंगोली' या पत्त्यावर सुरू करण्यात आले आहे. वीज ग्राहकांना आपल्या तक्रारी म ांडण्यासाठी आणि मार्गदर्शनासाठी या कार्यालयात सकाळी ११:०० वाजेपासून सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत कार्यालय प्रमुख स्वतः उपस्थित राहणार आहेत.

येत्या ११ ऑगस्ट रोजी वीज ग्राहकांच्या विविध मागण्यांसाठी एका भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाच्या वेळी महावितरण प्रशासनाकडे दाखल करावयाचे अधिकृत अर्जाचे नमुने या नवीन कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आले आ- हेत. हा तक्रार अर्ज कसा भरावा, याबाबतचे सविस्तर मार्गदर्शनही येथे केले जाईल. १० ऑगस्टपूर्वी अर्ज नेण्याचे आवाहन वीज ग्राहक समितीने सर्व सामान्य नागरिक, व्यावसायिक आणि शेतकऱ्यांना केले आहे.

# ७ डीजेवर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त पोलिस विभागाच्यावतीने शांतता समितीच्या बैठकीत डीजे ऐवजी पारंपारीक वाद्य लावण्याचे आव- ाहन करण्यात आले होते परंतु दि १ ऑगस्ट रोजी काही मंडळांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत डिजे ला- वले होते. डिजेमुळे ध्वनीप्रदुषण आणि नागरिकांना त्रास होत असतांनाही डिजे लावण्यात आले होते. शहरातील मुख्य रस्त्यावरून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची मिरवणुकीत डिजेचा वापर केल्यामुळे शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर यांनी तब्बल ७ डिजे चालकांवर कारवाई करीत डिजेचे वाहन शहर पोलिस ठाण्यात जप्त करीत गुन्हे दाखल केले आहेत.

# नगर परिषद वसाहतीमध्ये अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आरोग्य शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**
एक ऑगस्ट २०२६ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती नगरपरिषद वसाहत येथे म ान्यवरांच्या उपस्थितीमध्ये मध्ये साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम महामानवांच्या प्रतिमेस पूजन करून नगराध्यक्ष श्रीराम दादा बांगर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या कार्यक्रमाची उद्घाटक डॉक्टर अम ोल धुमाळ व सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन केले. यानंतर जयंती महोत्सव यांच्यावतीने म ोफत आरोग्य शिबिर चे आयोजन करण्यात आले तसेच स्थानिक नगरसेवक यांच्या वतीने एस आय आर विशेष सखोल समीक्षा कॅम्प जयंती निमित्त आयोजित करण्यात आले होते. त्याचबरोबर गुणवंत विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते त्यांना शाल, मोमेटो हार घालून गुण गौरव त्यांना करण्यात आला त्याच बरोबर अनेक विविध क्षेत्रात सन्मान करण्यात आले

शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. त्यानंतर भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधवांची उपस्थिती होती.

# पशू संरक्षण कायद्यांतर्गत दाखल प्रकरणाशी माझा कोणताही संबंध नाही-इमरान अली

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २ ऑगस्ट**



पशू संरक्षण कायद्यांतर्गत दाखल झालेल्या कथित प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर वसमत नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष सय्यद इमरान अली यांनी व्हिडिओद्वारे आ- पली सविस्तर भूमिका मांडत संबंधित प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचा दावा केला आहे. तसेच, केवळ राजकीय हेतू साधण्यासाठी आणि आपली प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशाने या प्रकरणात आपले नाव गोवण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

सय्यद इमरान अली यांनी प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओत म्हटले आहे की अलीकडील काही वृत्तांमध्ये पशू संरक्षण कायद्यांतर्गत दाखल करण्यात आलेल्या कथित गुन्ह्याचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र या कथित गुन्ह्याशी माझा कोणताही संबंध नाही. काही विरोधकांकडून राजकीय हेतू साधण्यासाठी आणि स्वतःच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी माझे नाव या प्रकरणात ओढण्यात आले आहे. प्रशासकीय आणि कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर करून माझी प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावाही त्यांनी केला.

मी कायद्याचा पूर्ण आदर करणारा नागरिक आहे. संबंधित तपास यंत्रणांना आवश्यक ते सर्व सहकार्य करीत असून तपासात कोणताही अडथळा निर्माण केलेला नाही. न्यायव्यवस्थेवर माझा संपूर्ण विश्वास आहे. सत्य निश्चितपणे समोर येईल आणि माझी निर्दोषता सिद्ध होईल, याबाबत मला पूर्ण विश्वास आहे, असे इमरान अली यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की सार्वजनिक जी- वनात कार्य करणाऱ्या व्यक्तींवर विविध प्रकारचे आरोप होत असतात. मात्र कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविण्यापूर्वी न्यायप्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. सत्य बाहेर येईपर्यंत संयम राखणे आणि कायद्याचा सन्मान करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले. मी पूर्वीप्रमाणेच जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध असून लोकांचा विश्वास कायम राखण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करत राहीन. दरम्यान, संबंधित प्रकरणाचा तपास सुरू असून अधिकृत तपासा- तून समोर येणाऱ्या निष्कर्षांनंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया पार पडणार आहे.

# सांदीपनीमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी, अण्णाभाऊ साठे जयंती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**
सांदीपनी पब्लिक स्कूल सुनील नगर तरोडा बुद्रुक नांदेड येथील शाळेत लोकमान्य टिळक यांचा स्मृतिदिन व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शाळेत विविध कार्यक्रम संपन्न करण्यात आले कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक त्यांचे जीवन या विषयी माहिती दिली त्यानंतर सहशिक्षक अरविंद काळेवार यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे त्यांचे जीवन व कार्य यावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, माहेश्वरी मुकूल राठोड, उप मुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोगदंड खंडू यांनी केले.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चांगली ट्रॅव्हल्स बस देण्याचे आमिष; १७.७१ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

जुनी पण चांगल्या स्थितीतील ट्रॅव्हल्स बस देण्याचे आमिष दाखवून तब्बल १७ लाख ७१ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद विष्णु मुंडे (रा. परळी वैजनाथ, जि. बीड, सध्या रा. वासुदेव हाइट्स, मानाजीनगर, नऱ्हे, पुणे) यांनी फिर्यादी उषा पुरुषोत्तम नवगिरे (वय ३७, रा. जळकोट, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) व त्यांच्या पतीचा विश्वास संपादन केला. चांगल्या स्थितीतील जुनी ट्रॅव्हल्स बस देण्याचे आश्वासन देत त्यांनी वेळोवेळी १७ लाख ७१ हजार रुपये स्वीकारले.

मात्र, फिर्यादीला खराब अवस्थेतील, स्वतःच्या नावावर नसलेली व कागदपत्रे अपूर्ण असलेली ट्रॅव्हल्स बस देण्यात आली.

त्यानंतर कागदपत्रे क्लिअर करून देण्याचे सांगत बस परत नेली, परंतु बसचे पैसेही परत न करता विश्वासघात करून फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणी उषा नवगिरे यांनी १ ऑगस्ट रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### नळदुर्गात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**नळदुर्ग, दि.२ ऑगस्ट -**

नळदुर्ग येथील साठेनगरमध्ये साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते, तर पोलीस निरीक्षक राजेंद्र गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. लहान मुलांनी अण्णाभाऊंच्या जीवनचरित्रावर प्रभावी भाषणे सादर केली तसेच विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम झाले. जयंती उत्सव समितीच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष आकाश गायकवाड यांच्यासह बाबा काळे, नागनाथ भिडे, ज्ञानेश्वर काळे, अरुण देडे, अविनाश काळे, धनराज गायकवाड, नारायण हजारे, नवनाथ काळे, अजय गायकवाड, प्रकाश काळे, राजेंद्र काळे, लहु देडे, धनराज चव्हाण, मोरेश्वर देडे, यांनी परीश्रम घेतले.



### रुईभर विद्यालयात लेखन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त लेखन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना वाचन, चिंतन आणि सर्जनशील लेखनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. सानिका कोकरे हिने प्रभावी कथाकथन सादर केले, तर विद्यार्थ्यांनी लेखन व वाचन संस्कृतीवर मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमात प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रा. नाईकवाडी, प्रा. नाना पवार, प्रा. शेटे, प्रा. आगळे, प्रा. प्रशांत कोळगे, प्रा. सुहास मरगणे, शिल्पाताई चौगुले, गुरव यांच्यासह डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषदादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, नानासाहेब शेलार व काकासाहेब डोंगरे उपस्थित होते.



### अक्षरवेल मंडळाचा वृक्षारोपण व साहित्य मैफलीचा प्रेरणादायी उपक्रम

**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

पर्यावरण संवर्धन आणि साहित्य संवर्धनाचा सुंदर संगम साधत अक्षरवेल महिला साहित्य मंडळ, धाराशिव यांच्या वतीने एमआयडीसी परिसरातील वेणू ग्रीनरी येथे वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. वृक्षारोपणानंतर झालेल्या साहित्यिक मैफलीत सदस्यांनी स्वरचित कविता, गझल आणि कथा सादर केल्या. किरण देशमाने व डॉ. सुलभा देशमुख यांच्या गझलांना, तर सुनिता गुंजाळ यांच्या हास्य लघुकथेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जयश्री फुटाणे, सविता गुंड यांच्यासह अनेकांनी काव्यसादरीकरण केले. आळंदी ते पंढरपूर पायी वारी पूर्ण केल्याबद्दल अलका तावडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. अनार साळुंके, डॉ. विद्या देशमुख, वैजयंती तावडे, शिवनंदा माळी, सीमा नवले, विमल तावडे, साधना तावडे, विद्या डोईफोडे, प्राची नाईकवाडी आदींनी परिश्रम घेतले.



### सिद्धेश्वर विद्यालयात साठे जयंती व टिळक पुण्यतिथी उत्साहात

**परंडा, दि.२ ऑगस्ट -**

देवगाव (खुर्द) येथील सिद्धेश्वर विद्यालयात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक धनंजय गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात ग्रा.पं. सदस्य बळीराम कांबळे व किशोर वाघमारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास शिक्षणप्रेमी, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन मुंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शेख, लोखंडे, कोकणे व काळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिक्षणमहर्षी स्व. सि.ना. आलुरे गुरुजींना पाचव्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

### दै. तरुण भारतच्या 'कर्मयोगी दीपस्तंभ' पुरवणीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन





### पुण्यतिथी विविध सामाजिक उपक्रमाने साजरी

**श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि.२ ऑगस्ट -**

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरचे संस्थापक सचिव, माजी आमदार, शिक्षणमहर्षी स्वर्गीय सि.ना. आलुरे गुरूजी यांची आज (२ ऑगस्ट) रोजी पाचवी पुण्यतिथी जवाहर महाविद्यालयाच्या प्रांगणावरील 'प्रेरणास्थळी' संपन्न झाली.

सोलापूर जिल्हाचे माजी खासदार जय सिद्धेश्वर महास्वामीजी नूतन आमदार बसवराज पाटील यांनी समाधी स्थळाचे दर्शन घेतले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामचंद्र दादा आलूरे, माजी जि.प. सदस्य महादेवप्पा आलुरे, जेष्ठ विधीज्ञ ॲड. लक्ष्मीकांत पाटील, ॲड. नागनाथ कानडे, शाम आलुरे, ॲड. दिपक आलुरे, जि.प. सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, विक्रम आलुरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, ग्रा.प. सदस्य बाळकृष्ण घोडके, बालाजी घुगे, मल्लिकार्जुन नर, बालाजी कुलकर्णी, गंगा कापसे, अरविंद आलुरे, संगमेश्वर जळकोटे, जवाहरचे मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, दैनिक तरूण भारतचे प्रतिनिधी श्रीकांत अणदूकर, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, आजी, माजी विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यानंतर जवाहर विद्यालयाच्या एन.सी.सी. कॅडेट्स यांनी गुरूजींच्या प्रेरणास्थळासमोर मानवंदना दिली. सकाळी ९ वाजता प्रेरणास्थळी वेदमूर्ती बसवराज स्वामी, तीर्थ यांनी विधीवत मंत्रोच्चारात पूजापठण केले. स्वर्गीय गुरूजींना आवडणाऱ्या या भारतात बंधूभाव नित्य वसू दे, खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे, बलसागर भारत होवो या प्रार्थना सामुदायिक गायल्या. विद्यालयातील एकल पाल्य, गरजू व होतकरू सहा विद्यार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात शालेय गणवेश, वह्या, लेखणी मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. पुण्यतिथीनिमित्त, बसवराज निसरगुंडे यांनी विद्यालयासाठी सहा ग्रीन बोर्ड भेट दिले.

पुण्यतिथीनिमित्त गुरूजींच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सहकार, एकूणच जीवनपटावरआधारित दैनिक तरूण भारतच्या 'कर्मयोगी दीपस्तंभ' या पुरवणीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी आलुरे परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते. अणदूर व अणदूर पंचक्रोशीतील गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षणप्रेमी, पत्रकार, सेवानिवृत्त गुरूजन, शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, जवाहर विद्यालय व महाविद्यालयातील मुख्याध्यापक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रा. मल्लिनाथ बिराजदार व रोहित मोरे यांनी केले.

## ट्रक विक्रीच्या व्यवहारात साडेदहा लाखांची फसवणूक

### पैसे मागितल्यावर मारहाण; लोहाऱ्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

ट्रक विक्रीच्या व्यवहारातून साडेदहा लाख रुपयांची फसवणूक करून पैसे मागण्यासाठी गेलेल्या व्यक्तीला मारहाण केल्याप्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोघा खुर्द (ता. लोहारा) येथील बाजीराव दिनकर भोंडवे यांनी फिर्यादी सुनील मच्छिंद्र पवार (वय ३५, रा. पोहोरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर) यांच्यासोबत एमएच ०९ बीए ८६३१ क्रमांकाच्या ट्रकचा ११ लाख रुपयांचा व्यवहार केला होता. त्यापैकी आरोपीने केवळ ५० हजार रुपये अदा केले. उर्वरित १० लाख ५० हजार रुपयांची रक्कम मागण्यासाठी फिर्यादी आरोपीकडे गेले असता, ठरलेली रक्कम न देता त्यांना चापट मारून शिवीगाळ करण्यात आली. तसेच त्यांच्या १० लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणी सुनील पवार यांनी १ ऑगस्ट रोजी दिलेल्या फिर्यादीवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## तुळजाभवानी मंदिर संस्थानचे सीईओ तामोरे यांची ५८ दिवसांतच बदली

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२ ऑगस्ट -**

तुळजाभवानी मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) उपेंद्र तामोरे यांची अवघ्या ५८ दिवसांच्या कार्यकाळानंतर पदोन्नतीवर बदली करण्यात आली आहे. त्यामुळे मंदिर संस्थानचे सीईओ पद पुन्हा रिक्त झाले असून, या निर्णयाची भाविक आणि प्रशासकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.



उपेंद्र तामोरे यांनी २ जून रोजी तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या सीईओपदाचा कार्यभार स्वीकारला होता. राज्य शासनाने त्यांची आता रत्नागिरी-सिंधुदुर्ग जात पडताळणी समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.

तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या इतिहासात प्रथमच अप्पर जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची सीईओपदी नियुक्ती झाली होती.

मंदिराच्या विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रशासनात गतिमानता आणण्याच्या दृष्टीने त्यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात होती. मात्र, केवळ दोन महिन्यांच्या आतच झालेल्या बदलीमुळे विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

कार्यभार स्वीकारल्यानंतर तामोरे यांनी सशुल्क दर्शन आणि धर्मदर्शन रांगांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेतला होता. सर्व भाविकांना समान पद्धतीने दर्शन मिळावे, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले होते.

मात्र, त्यानंतर धर्मदर्शन रांगेतील प्रतीक्षाकाळ वाढल्याच्या तक्रारी समोर आल्या. वाढती गर्दी, रांगांतील गोंधळ आणि काही वेळा झालेल्या वादांमुळे या निर्णयावर टीकाही झाली.

> **नव्या सीईओच्या नियुक्तीकडे लक्ष...**
> तामोरे यांची बदली ही नियमित प्रशासकीय पदोन्नतीचा भाग असली, तरी तिच्या वेळेबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू आहे. आता तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी कोणाची नियुक्ती होणार, तसेच मंदिराची दर्शन व्यवस्था आणि विकास आराखड्याची अंमलबजावणी पुढे कशी होणार, याकडे भाविक आणि स्थानिकांचे लक्ष लागले आहे.

## शेतीच्या व्यवहारातून छळ; शेतकऱ्याची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

शेतीच्या व्यवहारातून झालेल्या कथित फसवणुकीसह जातीवाचक शिवीगाळ व मानसिक छळाला कंटाळून एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात ट्रॉसिटीसह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, पांडुरंग मारुती सातपुते (वय ४६, रा. पिंपरी बे, ता. जि. धाराशिव) यांनी ३१ जुलैच्या रात्री ते १ ऑगस्टच्या पहाटेदरम्यान शाहूराज करवार यांच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली.

या प्रकरणी मयताची पत्नी अनिता पांडुरंग सातपुते (वय ४०) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, योगेश महादेव गरड (रा. पिंपरी बे, ता. जि. धाराशिव) यांनी शेती विक्री करून संपूर्ण रक्कम स्वीकारली, मात्र शेतीचा ताबा दिला नाही. तसेच वारंवार जातीवाचक शिवीगाळ करून तुझी काय लायकी आहे अशा शब्दांत अपमान व मानसिक त्रास दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सततच्या त्रासाला कंटाळून पांडुरंग सातपुते यांनी आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी १ ऑगस्ट रोजी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## अचलेर तांड्यावर तरुणाला बेदम मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील अचलेर तांडा येथे किरकोळ वादातून सहा जणांनी एकत्र येऊन एका तरुणाला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी, बाभळीच्या काटेरी झुडपाने व दगडाने मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी मुरुम पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ जुलै रोजी अचलेर तांडा येथे आरोपी शिवाजी राठोड, रेखा राठोड, मोतीराम पवार, ताराबाई पवार, अभिजित पवार व अन्य एकजण (सर्व रा. अचलेर तांडा, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांनी एकत्र येऊन फिर्यादी विजयकुमार पोमा पवार (वय ३८, रा. अचलेर तांडा, ह.मु. जुने घरकुल, सोना-चांदी चौक, सोलापूर) यांना शिवीगाळ केली. आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत बाभळीच्या काटेरी झुडपाने व दगडाने मारहाण करून जखमी केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

## दोन भीषण अपघातांत दुचाकीस्वारांचा मृत्यु

### बेंबळी व परंडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

धाराशिव जिल्ह्यातील बेंबळी व परंडा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत झालेल्या दोन वेगवेगळ्या रस्ते अपघातांमध्ये दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला असून, संबंधित प्रकरणी निष्काळजी वाहनचालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



१२ एप्रिल २०२६ रोजी रात्री श्रीकांत तुकाराम कागे (वय २८, रा. उजणी, ता. औसा, जि. लातूर) हे एमएच २४ सीए ३६४६ क्रमांकाच्या दुचाकीवरून जात असताना बेंबळी-उजणी मार्गावरील धुत्ता पाटीजवळ हरिभाऊ वाघमोडे यांच्या शेतानजीक अज्ञात वाहनाने भरधाव व निष्काळजीपणे धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या श्रीकांत कागे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी शाहूराज तुकाराम कागे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**परंड्यात ट्रॅक्टर-ट्रॉलीच्या धडकेत दुचाकीस्वार ठार :** परंडा शहरातील मोरे हॉस्पिटलसमोर १ ऑगस्ट रोजी सायंकाळी नितीन नागनाथ गुडे (वय ४०, रा. आवार पिंपरी, ता. परंडा) हे दुचाकीवरून जात असताना एमएच २६ बीक्यू ८५०३ क्रमांकाच्या ट्रॅक्टरला जोडलेल्या एमएच १३ टी १८०५ व एमएच १३ टी ८६०६ क्रमांकाच्या ट्रॉलींपैकी पहिल्या ट्रॉलीची धडक बसल्याने गंभीर अपघात झाला.

या अपघातात नितीन गुडे यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी ट्रॅक्टर चालक संतोष बाळू कापरे (रा. कुर्डू, ता. माढा, जि. सोलापूर) याच्याविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांकडून सुरू आहे.

## पीक विमा भरपाईतून ३१ गावे वगळल्याचा आरोप




### काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील ३१ गावांतील शेतकऱ्यांना पीक विमा भरपाईतून वगळण्यात आल्याने संतापाची लाट उसळली असून, पीक कापणी प्रयोगातील कथित प्रशासकीय त्रुटींमुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या प्रकरणात तातडीने दुरुस्ती करून शेतकऱ्यांना विमा भरपाई द्यावी, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल आणि त्यानंतर कायदेशीर लढाही उभारला जाईल, असा इशारा राष्ट्रीय काँग्रेसचे लोहारा तालुकाध्यक्ष दयानंद पाटील यांनी दिला.

लोहारा तालुक्यात चार महसूल मंडळांअंतर्गत ४७ गावांचा समावेश आहे. मात्र धानुरी, माकणी आणि जेवळी या तीन महसूल मंडळांतील एकूण ३१ गावे पीक विमा भरपाईपासून वंचित राहिल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनाची घोषणा करण्यात आली.

यावेळी शहराध्यक्ष रौफ बागवान, युवक काँग्रेस शहराध्यक्ष प्रकाश होंडराव, बाबू हेड्डे, बसवराज पाटील कास्तीकर, गौतम माटे, शरणप्पा शेगडी यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या तफावतीमुळेच अनेक गावांतील शेतकरी पीक विमा भरपाईपासून वंचित राहिल्याचा आरोप काँग्रेसने केला असून, प्रशासनाने तातडीने फेरतपासणी करून न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

काँग्रेसने सॅटेलाइटद्वारे नोंदविलेल्या उत्पादनाच्या अंदाज आणि प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगातील आकडेवारीत मोठी तफावत असल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे.

> **सॅटेलाइट आणि पीक कापणी प्रयोगात मोठी तफावत**
> **लोहारा मंडळ :** सॅटेलाइट अंदाज - १,०३८ किलो, कापणी प्रयोग - ५४९ किलो
> **माकणी मंडळ :** सॅटेलाइट अंदाज - १,०७६ किलो, कापणी प्रयोग - ८०२ किलो
> **जेवळी मंडळ :** सॅटेलाइट अंदाज - १,०८६ किलो, कापणी प्रयोग - ८८६ किलो

### धाराशिव प्रशालेत प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

उस्मानाबाद जिल्हा स्वातंत्र्यसैनिक समिती संचलित धाराशिव प्रशालेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

यानिमित्ताने दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी गौरी माने, सुधीर पवार, पांडुरंग देशमुख यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.